रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १३९
www.ramprahar.com
◆ शनिवार, ६ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

चोरीच्या घटना रोखण्यासाठी उपाय करा; भाजपची मागणी/३
कालवा सफाईच्या नावाखाली माणगावमध्ये वृक्षांची कत्तल/५
कशेणेकरांची घरे होणार अधिकृत; भाजपचा पुढाकार/७

## मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार! 'सर्वोच्च' शिक्कामोर्तब



**नवी दिल्ली :** राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले, मात्र ही मतदान प्रक्रिया राबवली जात असताना अंतिम दोन दिवसांमध्ये राज्यातील काही नगरपालिकांचे मतदान लांबणीवर टाकत ते २० डिसेंबर रोजी तसेच त्यांची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार असल्याचा निर्णय घेतला गेला. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानंतर सर्वच निवडणुकांची मतमोजणी लांबणीवर पडली. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. या प्रकरणाची सुनावणी झाली असताना सर्वोच्च न्यायालयाने मतमोजणी २१ डिसेंबराच होणार असल्याचे सांगितले आहे. खंडपीठाने निवडणुकांचा जो कालावधी निश्चित केला आहे. त्याच्या आत म्हणजेच ३१ जानेवारीपूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

# उरण रेल्वे मार्गावर नवीन स्थानकांसह अतिरिक्त फेऱ्यांना मोदी सरकारची मंजुरी

### आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याला यश




**उरण : बातमीदार**

नवी मुंबई आणि मुंबईकरांच्या रोजच्या प्रवासाला मोठा दिलासा देणारी भेट मोदी सरकारने जाहीर केली असून नेरूळ-उरण आणि बेलापूर-उरण रेल्वे मार्गावर अतिरिक्त लोकल फेऱ्या सुरू करण्यासोबतच तरघर आणि गव्हाण या दोन नवीन स्टेशनांना मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे नवी मुंबई व आसपासच्या भागातील लाखो प्रवाशांच्या दैनंदिन प्रवासातील त्रासात मोठी घट होणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे निवेदन दिले होते. त्यास केंद्र सरकारने सकारात्मक प्रतिसाद देत तत्काळ मंजुरी दिली. दरम्यान, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी तसेच भाजपचे युवा नेते प्रितम म्हात्रे यांनीदेखील यासंदर्भात सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून उरण, पनवेल आणि नवी मुंबईकरांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार महेश बालदी आणि युवा नेते प्रीतम म्हात्रे यांच्या पुढाकाराचे विशेष कौतुक केले जात आहे. (पान २ वर..)

> *हा निर्णय नवी मुंबई आणि आसपासच्या परिसरातील लाखो प्रवाशांसाठी मोठा दिलासा आहे. रोजच्या प्रवासातील वेळ, खर्च आणि कष्ट कमी करण्यासाठी ही सेवा अत्यंत महत्त्वाची ठरेल. मुंबईकरांच्या, नवी मुंबईकरांच्या व उरणमधील जनतेच्या सुविधेसाठी घेतलेल्या या लोकहिताच्या निर्णयाबद्दल मी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार मानतो.*
>
> **-महेश बालदी, आमदार, उरण विधानसभा मतदारसंघ**



## 'अटल करंडक'च्या महाअंतिम फेरीला शानदार सुरुवात





(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरी सोहळ्याचे उद्घाटन पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.५) शानदारपणे झाले.

तीन दिवस चालणाऱ्या या महाअंतिम फेरीत राज्यभरातून १०० हुन अधिक एकांकिकांमधून निवड झालेल्या उत्कृष्ट २५ एकांकिका सादर होणार असून नाट्य रसिकांना मोठी मेजवानी मिळाली असून विशेष म्हणजे या सोहळ्याला युवा ते ज्येष्ठ नाट्य रसिकांची मोठी गर्दी पहायला मिळाली.

१२व्या पर्वाच्या या सोहळ्याच्या प्रारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, राजू सोनी, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, सुरेखा कल्याणकर, (पान २ वर..)

> ही स्पर्धा सर्वांच्या सहकार्य आणि मेहनतीने यशस्वी होत असते, त्यामुळे दमदारपणे १२व्या पर्वात पाऊल टाकले आहे. पनवेलच्या सांस्कृतिक क्षेत्राची पाळेमुळे घट्ट आहेत आणि ती अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहणार आहोत.
>
> **-परेश ठाकूर,** स्पर्धा प्रमुख व उपाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा

## महाराष्ट्राने गाठला सौर कृषी पंप लावण्याचा जागतिक उच्चांक

### गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' अंतर्गत एका महिन्यात ४५,९११ सौर कृषी पंप लावण्याचा जागतिक उच्चांक गाठल्याबद्दल राज्य शासनाच्या वतीने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स प्रमाणपत्र स्वीकारले. या वेळी मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राची सौर कृषीपंप आणि सौर कृषीवाहिनी योजना इतर राज्यांनीही सुरू कराव्यात असे आवाहन केले. देशातील सौरपंपांपैकी ६५% सौरपंप महाराष्ट्र राज्यात लागले गेले आहेत, याचा फायदा असा की, महाराष्ट्राचे शेतकरी ३६५ दिवस मोफत वीज वापरु शकतात. दरवर्षी फक्त २० ते २५ हजार सौर कृषीपंप लावणारा महाराष्ट्र, एका महिन्यात ४५,९११ सौर कृषीपंप लावतो, जे अभिमानास्पद आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस या वेळी म्हणाले.

## भारत-रशियात सात महत्त्वाचे करार



**नवी दिल्ली :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतिन भारत दौऱ्यावर आहेत. अनेकार्थाने पुतिन यांचा भारत दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. अवघ्या जगाचे लक्ष या दौऱ्याकडे आहे. सर्व प्रोटोकॉल बाजूला ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः पुतिन यांचे स्वागत करण्यासाठी पालम विमानतळावर गेले. यानंतर दोघे पंतप्रधान निवासस्थानी पोहोचले. यानंतर शुक्रवारी दोन्ही देशांमध्ये अनेक क्षेत्रात मोठे आणि महत्त्वाचे करार झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, व्लादीमीर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात हैदराबाद हाऊस येथे द्विपक्षीय चर्चा संपन्न झाली. चर्चेनंतर दोन्ही देशांमध्ये करारांची देवाणघेवाण झाली. पंतप्रधान मोदी आणि पुतिन यांच्यात झालेल्या चर्चेदरम्यान झालेल्या करारांमध्ये कामगार स्थलांतर, आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, अन्न सुरक्षा, जहाजबांधणी, रसायने आणि खते यासारख्या मुद्द्यांचा समावेश होता. पुतिन यांच्यासोबत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदींनी रशियाच्या लोकांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली.

## शिवाजीनगर येथील अखंड हरिनाम सप्ताहाची पुष्पवृष्टीने सांगता






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर येथे मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी ते दत्तजयंती या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची शुक्रवारी (दि.५) पुष्पवृष्टीने सांगता झाली.

या तीन दिवसीय सप्ताहात भजन, प्रवचन आणि कीर्तनाचे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, ज्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. सप्ताहांतर्गत शुक्रवारी श्री बाळकृष्ण माऊलींवर पुष्पवृष्टी करण्यात आली, ज्याचा अनुपम सोहळा भाविकांनी अनुभवला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये एक विशेष उपक्रम राबवण्यात आला.

या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी मठाधीपती बाळासाहेब महाराज नंदेश्वर, रमण ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, रत्नप्रभा घरत, गजानन ठाकूर, पद्माकर ठाकूर, किसन मोकल, शिवाजी ठाकूर, किशोर ठाकूर, जि.के. ठाकूर, आत्माराम मोकल, कल्पना ठाकूर, चंद्रभागा घरत, नंदा ठाकूर, भागिरथी मोकल, आशा म्हात्रे, वर्षा म्हात्रे, प्रिया ठाकूर, उज्वला कडू, भुपेश कडू, श्याम घरत यांच्यासह अनेक मान्यवर आणि भाविक उपस्थित होते. (पान २ वर..)



# संघर्षातून पुढे आलेल्या युवकांनी समाजाचे ‘रोल मॉडेल’ व्हावे -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई,: रामप्रहर वृत्त**

अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा निर्णय हा माझ्या जीवनातील सर्वात समाधान देणारा निर्णय आहे. संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या ‘संधीची समानता’ या तत्त्वाच्या प्रेरणेने राज्य शासनाने १ टक्का अनाथ आरक्षणाचा निर्णय घेतला आहे, या निर्णयामुळे ८६२ अनाथ युवक-युवती स्वावलंबी होऊन समाजासाठी कार्यरत असल्याचा अभिमान वाटतो, शासनाच्या वर्षपूर्तीची सुरुवात सुंदर कार्यक्रमाने झाली असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाचा लाभ घेऊन शासकीय सेवेत रुजू झालेल्या अनाथ मुलांशी संवाद साधला. कार्यक्रमास विधानपरिषद आमदार श्रीकांत भारतीय व लाभार्थी अनाथ युवक युवती उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आज मलाही मुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन वर्ष झाले. या वर्षपूर्तीची सुरुवातप्रसंगी अतिशय सुंदर कार्यक्रमाने झाली. निःशब्द भाव खूप बोलणारा असतो, तसा भाव आज माझ्या मनात आहे. शासनात अनेक निर्णय घेतले जातात, अनेक कामे केली जातात, पण काही निर्णय मनाला गहिवर देतात. तसाच अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा निर्णय आहे.

संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘संधीची समानता’ हे तत्व आपल्या संविधानात समाविष्ट केले. पण ही समानता केवळ सामाजिक आरक्षणातून मर्यादित राहता कामा नये. अनाथ, दिव्यांग आणि इतर वंचित घटकांनाही संधी मिळायला हवी. त्या विचारातूनच १ टक्के अनाथ आरक्षणाचा निर्णय झाला. या निर्णयामुळे अनेकांच्या आयुष्यात खरा बदल घडला आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

आपण जे काही साध्य करतो, ते समाजाने निर्माण केलेल्या व्यवस्थेमुळे शक्य होते. शाळा, संस्था, शासनव्यवस्था, उद्योग हे सर्व समाजाच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. त्यामुळे या समाजाला परत काहीतरी देणे, हा प्रत्येकाचा धर्म आहे. संघर्षातून पुढे आलेले हे युवक समाजात ‘रोल मॉडेल’ बनावेत, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली. जिथे पोहोचलात तिथे थांबू नका. संघर्षातून मिळवलेले यश हे पुढे समाजासाठी अविरत कार्य करण्याची प्रेरणा ठरावी. स्थैर्य मिळाल्यानंतरही समाजासाठी काहीतरी देण्याची भावना मनात कायम ठेवावी,

माणसाचे कार्यच त्याला अमरत्व देतं. कार्यातूनच माणूस जिवंत राहतो. म्हणून तुमचं कार्यच तुमची ओळख बनवा, असे सांगून कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व अनाथ युवकांचा गौरव केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जास्त व्याजाचे आमिष देऊन कोट्यवधीची फसवणुक; दोघांना अटक

**मुरूड : प्रतिनिधी**

मरूड तालुक्यातील नांदगाव येथील राहील सोंडे,सलमान दिवाण, सुफियान दिवाण या तिघानी मिळून कमी कमी एक लाख रुपये गुंतवल्यास ७ किंवा १० टक्के व्याज प्रत्येक महिन्यास दिले जाईल असे अभिवचन देऊन स्थानीक लोकांकडून करोडो रुपयांच्या ठेवी गोळा करून फसवणुक केल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असुन दोघांना अटक करण्यात आले आहे

या तिघांनी मिळून सन २०२२,२३, या दोन वर्षी व्यवसाय व्यवस्थित सुरू ठेवल, परंतु सन २०२४ रोजी या तिघांनी लोकांना व्याज देणे बंद केले. तेव्हा लोक त्यांना विचारणा करू लागले व्याज का मिळत नाही त्यावेळी या तिघांनी व्यवसायात तोटा आल्याचे कारण सांगून व्याज देण्यास टाळा टाळ करू लागले. व्याज देत नसल्याने गुंतवणूकदार यांनी आपल्या ठेवी मागितल्या परंतु तदनंतर हे तिघेही गायब झाल्याने सर्व ठेवीदार एकत्र येऊन फसवणूक झाल्याची लेखी तक्रार सर्वप्रथम महंमद तलवसकर व अन्य व्यक्तींनी मुरूड पोलीस ठाण्यात नोंदवली.

मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी विशेष तपास पथक तयार करून पनवेल येथून राहील सोंडे व सुफियान दिवाण याना अटक करून मुरुड पोलीस ठाण्यात आणले आहे. यातील फरार आरोपी सलमान दिवाण याचा शोध सुरु आहे.

याबाबत पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी सांगितले कि, स्थानिक लोकांच्या आतापर्यंत एक कोटी रुपयांच्या फसवणूक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणात आणखीन तक्रारदार वाढून मुद्दल रकमेत वाढ होण्याची शक्यता आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

## पनवेल महापालिकेतर्फे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक शिडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात गेल्या काही वर्षांत वेगाने वाढ होत असून, लोकसंख्या, गृहनिर्माण प्रकल्प, व्यापारी संकुले, मॉल्स, रुग्णालये, हॉटेल्स तसेच उद्योगक्षेत्र यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यासोबतच उंच इमारती, हाई-राईज रेसिडेन्शियल टॉवर्स, कार्यालयीन संकुले मोठ्या प्रमाणावर उभी राहत आहेत. या पार्श्वभूमीवर आगीच्या घटना व इतर आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि प्रभावी प्रतिसाद देणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेने ५५ मीटर व २८ मीटर उंचीपर्यंत कार्यक्षम अशा अत्याधुनिक एरियल लॅडर प्लॅटफॉर्म वाहनांची खरेदी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

५५ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्म हे उंच इमारतींमध्ये (१५ ते २० मजले व त्यापेक्षा जास्त) पोहोचण्यासाठी उपयोगी ठरेल, तर २८ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्म मध्यम उंचीच्या इमारती, गृहनिर्माण संकुले, रुग्णालये, शाळा,



हॉटेल्स आदी ठिकाणी बचावकार्यासाठी उपयुक्त ठरेल. या खरेदी प्रक्रियेसाठी निविदा मागवण्यात आल्या असून, तांत्रिक निकषांनुसार पात्र कंपन्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यानुसार आवश्यक तांत्रिक वैशिष्ट्ये, सुरक्षितता मानके, कार्यक्षमता व दीर्घकालीन देखभाल खर्च यांची सखोल तपासणी करून योग्य तो प्रस्ताव निवडण्यात येणार आहे.

या संपूर्ण प्रकल्पावर सुमारे २२ कोटींहून अधिक खर्च (जीएसटीसह) येणार असून, ही गुंतवणूक शहराच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या माध्यमातून पनवेल महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग अधिक सक्षम, आधुनिक आणि सुसज्ज होणार आहे. महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे नागरिकांना अधिक सुरक्षित वातावरण मिळेल, तसेच भविष्यातील वाढत्या लोकसंख्या व उंच इमारतींशी संबंधित आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रशासन सज्ज राहील.

> **नागरिकांचे प्राण व मालमत्तेचे संरक्षण हीच महापालिकेची सर्वोच्च जबाबदारी असून, त्या दृष्टीने पनवेल महानगरपालिका सातत्याने आधुनिक सुविधा उभारण्याचा प्रयत्न करत आहे. ५५ मीटर व २८ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्मची खरेदी हा त्याचाच एक महत्त्वाचा भाग आहे.**
>
> **-मंगेश चितळे, आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका**

## रिसायक्लोथॉन उपक्रमात ४६६ किलो प्लास्टिक संकलन

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुक्त नवी मुंबई ही संकल्पना नजरेसमोर ठेवून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्रोजेक्ट नवी मुंबई संस्थेच्या सहयोगाने विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये ‘प्लास्टिक रिसायक्लोथॉन’ हा अभिनव उपक्रम नमुंमपा व प्रोजेक्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने, माईन्ड स्पेस आरईआयटी यांच्या सहकार्याने यशस्वीपणे राबविण्यात आला.

महानगरपालिका क्षेत्रातील नागरिक, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांच्याकडून या उपक्रमाला उत्साही सहभाग लाभला. या उपक्रमांतर्गत नवी मुंबई शहरातून ४६६ कि.ग्रॅ. प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या माध्यमातून लोकसहभागाव्दीरे पर्यावरण संवर्धनाकडे एक यशस्वी पाऊल उचलण्यात आले.

या मोहिमेमध्ये नमुंमपा कुकशेत, शिवाजीनगर, दिवाळे, गोठीवली, घणसोली तसेच एमईएस विद्यामंदिर बेलापूर,विद्याभवन शाळा नेरूळ आदी शैक्षणिक संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदविला. आरएससीसीएल बेलापूर, मानराव चॅरिटेबल ट्रस्ट वाशी, कलश उद्यान कोपरखैरणे, ग्रीन वर्ल्ड दिघा, पिरॅमिड एलिमेंट्स दिघा अशा विविध सोसायट्या आणि संस्था व नागरिकांनी या मोहीमेत उत्साहाने सहभाग नोंदवला.

या उपक्रमांत्रगत संकलित प्लास्टिकवर प्रोजेक्ट मुंबई संस्थेच्या माध्यमातून पुनर्प्रक्रियार करण्यात येणार असून माइंडस्पेसच्या सीएसआर निधीच्या सहाय्याने प्लास्टिकपासून बेंच, पेन, शर्ट इ. वस्तू तयार केल्या जाणार आहेत.



## एड्स जनजागृतीसाठी बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग: रामप्रहर वृत्त**

जागतिक एड्स नियंत्रण दिन व पंधरवडा जनजागृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने युवकांमध्ये एचआयव्ही/एड्स विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अलिबाग येथे भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. अलिबाग समुद्रकिनारा कमानी परिसरातून अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली.

रॅलीचे आयोजन महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबागमार्फत करण्यात आले. यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ.किरण शिंदे, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रवीण कंदाडे, एचओडी पीसीएम नाझिया, एचओडी एसएमटी डॉ. साक्षी पाटील, दालसा मुख्य ॲड. सी. सी. कामथे, लायन्स क्लब श्रीबाग सेन्टिनियलच्या अध्यक्षा निहा घरत, ड. निहा राऊत, ड. अंकित बंगेरा आदी मान्यवर उपस्थित होते.



रॅलीदरम्यान अडथळ्यांवर मात करू, एकजुटीने एड्सला लढा देऊ, वचन पाळा, एड्स टाळा, स्त्री शक्तीचा एकच नारा-एचआयव्ही/एड्स हद्दपार करा अशा घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, होमिओपॅथिक कॉलेज व नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. आयसीटीसी इंटेसिफाइड आयईसी कॅम्पेनमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक: उपजिल्हा रुग्णालय रोहा - समुपदेशक महेश गोसावी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ मंगेश पाटील, द्वितीय क्रमांक: उपजिल्हा रुग्णालय माणगाव समुपदेशक प्रिया निवाते, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आरती राजपूत.तृतीय क्रमांक: जिल्हा रुग्णालय अलिबाग आयसीटीसी ०१ समुपदेशक अर्चना जाधव, प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता तुळपुळे,डीएसआरसी समुपदेशक सौ. अश्विनी कदम, मोबाईल आयसीटीसी व्हॅनचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, वाहनचालक अतिश नाईक, क्लिनर रुपेश पाटील यांना विशेष कामगिरीबद्दल गौरविण्यात आले. लोकपरिषद पनवेल, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट पेण, आधार ट्रस्ट पनवेल या स्वयंसेवी संस्थांनाही प्रमाणपत्र देण्यात आले. इंडेक्स टेस्टिंगमध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल रिलायन्स हॉस्पिटल, लोधिवलीचा गौरव करण्यात आला.

पान १ वरुन

## उरण रेल्वे मार्गावर नवीन स्थानकांसहअतिरिक्त फेऱ्यांना मोदी सरकारची मंजुरी

नेरूळ-उरण-नेरूळ या मार्गावर चार अतिरिक्त लोकल फेऱ्या आणि बेलापूरउरणबेलापूर या मार्गावर सहा अतिरिक्त फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. या नवीन सेवांमुळे उरण, खारकोपर, बामणडोंगरी, गव्हाण ते नेरुळ/बेलापूर या सर्व मार्गावरील प्रवाशांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे गर्दीच्या वेळी वाढीव गाड्या उपलब्ध झाल्याने प्रवास अधिक सुलभ होणार असून प्रवासात वेळेची मोठी बचत होणार आहे. तसेच या निर्णयाबद्दल नवी मुंबईतील नागरिक, उद्योगसमूह आणि प्रवासी संघटनांनी मोदी सरकार, राज्य सरकार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार महेश बालदी आणि युवा नेते प्रितम म्हात्रे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत. उरण, पनवेल आणि नवी मुंबईच्या पायाभूत सुविधा विकासातील हा आणखी एक सकारात्मक आणि ऐतिहासिक टप्पा ठरत आहे.

## ‘अटल करंडक’च्या महाअंतिम फेरीला शानदार सुरुवात

नलिनी शेलार, सिद्धीका पुंजानी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सावले, अभिनेते व दिग्दर्शक राजा अत्रे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक संजय भगत, शहर सरचिटणीस अमित ओझे, प्रीतम म्हात्रे, रुपेश नागवेकर, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, संजय जैन, पवन सोनी, पनवेल शहर युवा मोर्चाचे शहराध्यक्ष हिमेश बहिरा, आरती तायडे, मनिषा बहिरा तसेच कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, अमोल खेर, गणेश जगताप, वैभव बुवा आदी उपस्थित होते.

महाअंतिम फेरीच्या पहिल्या दिवशी वसंतराव नाईक विज्ञान संस्था नागपूरची एकांकिका ’वि. प्र’, मुलुंड वाणिज्य विद्यालय ’स्वातंत्र्य सौभाग्य’, मिथक मुंबईची ’कारण काय’, एकदम कडक नाट्य संस्था भाईंदरची ’ बकेट लिस्ट’,, वि. ग. वझे विद्यालय मुलुंडची ’द गर्दभ’, आर्टस कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज साताराचे ’सोयरीक’, नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरीची ’प्रतीक्षायान’, राजाराम बापू अभियांत्रिकी महाविद्यालय इस्लामपूरची ’हाफ वे’, कलादर्पण पनवेलची ’आख्यान- ए - झुरळ’, आणि रेवन एंटरटेनमेंट पुणेची ’सांग रहियो’ या दहा एकांकिकांचे सादरीकरण होते.

उर्वरित १५ एकांकिका शनिवार व रविवारी सादर होणार आहेत. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ०७ डिसेंबर रोजी होणार असून स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये आणि मानाचा ’अटल करंडक’ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध अभिनेते व निर्माता सुनिल बर्वे यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात नाट्य चळवळ एक मोठी परंपरा आहे. नाट्य क्षेत्रातून कलाकार घडत असतात. त्या अनुषंगाने हि परंपरा कायम रहावी आणि नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळावा, त्यांनी आपल्या अंगी असलेले कौशल्य सादर करून या क्षेत्रात उज्वल कामगिरी करावी हा कायम उद्देश अटल करंडकचा राहिला आहे. ही स्पर्धा जरी डिसेंबर महिन्यात होत असली तरी तयारी मात्र मे महिन्यापासून सुरु होत असते. तपशीलवार चर्चा आणि ज्येष्ठांचे मार्गदर्शन घेऊन नियोजन केले जाते, असे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांनी सांगितले.

## शिवाजीनगर येथील अखंड हरिनाम सप्ताहाची पुष्पवृष्टीने सांगता

देवसागर सादक समाज इंचगिरी सांप्रदाय, नंदेश्वर यांच्यावतीने भाविकांना श्री दासबोध ग्रंथाचे आणि श्री बाळकृष्ण महाराज गुरुचरीत्र अमृतच्या १७५ प्रतींचे वितरण करण्यात आले.



## रोटरी कर्णबधिर शाळेतील विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली



**पनलेल : रामप्रहर वृत्त**

३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनाच्या अनुषंगाने दि.५ डिसेंबर रोजी रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीमती राधाबाई खेमचंद परमार रोटरी कर्णबधीर मुलांच्या विशेष शाळेतर्फे नवीन पनवेल परिसरात दिव्यांग जनजागृती रॅली आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत दिव्यांग जनजागृतीचे तयार केलेले संदेश, फलक आणि घोषवाक्य हे रॅलीचे विशेष आकर्षण ठरले.

या जनजागृती रॅलीची सुरुवात शाळेच्या आवारातून झाली. शिक्षक व पालकांच्या सहकार्याने कर्णबधिर विद्यार्थी समान संधी -समान हक्क, सुलभ सुविधा हा प्रत्येकाचा अधिकार यांसारखे संदेश देत नागरिकांशी संवाद साधत होते. या रॅली मध्ये विद्यार्थ्यांनी ठराविक अंतरावर लेझीम नृत्य सादर केले. रॅलीमध्ये सुमारे १५० विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थेचे सभासद सहभागी झाले होते.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्षमतांना योग्य वाव मिळाल्यास ते समाजातील विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करू शकतात-अशा रॅलीमुळे समाजात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होते. त्यामुळे दरवर्षी शाळेतर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या रॅलीचे आयोजन करण्यात येत असते.

संस्थेचे सदस्य चारुदत्त भगत यांनी रॅलीमध्ये सहभागी झालेल्या सर्वांना फ्रुटीचे वाटप केले. तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा पनवेल यांच्यातर्फे रॅली मधील सहभागी विद्यार्थ्यांना कॅडबरी व पाणी बॉटलचे वाटप करण्यात आले.

या रॅलीमध्ये संस्थेचे चेअरमन अरविंद सावळेकर, सचिव प्रमोद वालेकर, चारुदत्त भगत, राजेंद्र ठाकरे, कल्पेश परमार, निलेश पोटे, ॲड. हितेश राजपूत, सुधीर कांडपिळे, प्रकाश शृंगारपुरे आणि शाळेच्या मुख्याध्यापिका शैला बंदसोडे आदी सहभागी झाले होते.

## मतदार यादी ऑनलाईन उपलब्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूकांच्या अनुषंगाने मतदारांना मतदार यादीत आपले नाव शोधणे सोपे जावे याकरीता राज्य निवडणूक आयोगामार्फत संकेत स्थळावर मतदारांना आपले नाव व क्रमांक शोधण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाऊनही मतदार हे मतदार यादीतील आपले नाव शोधू शकतात. यासाठी मुखपृष्ठावर स्वतंत्र आयकॉन उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

याशिवाय नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांमध्ये असलेल्या सुविधा केंद्रांमध्ये मतदार मदत कक्ष सुरु करण्यात आले असून या ठिकाणी जाऊन नागरिक मतदार यादीतील आपल्या नावाची माहिती जाणून घेऊ शकतात.

# जुना खोपटा पुलाच्या दुरुस्तीला सुरुवात

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पूर्व व पश्चिम भागाला जोडणारा खोपटा जुना पुलाच्या दुरुस्ती कामाला सुरुवात झाली आहे. वाहतुकीसाठी महत्वाच्या असलेल्या खड्डेमय खोपटे कोप्रोली मार्गाच्या व खोपटे खाडी पुलाच्या खोपटे पुलाच्या दुरुस्तीला पाच कोटींचा निधी खर्च करण्यात येणार आहे. या मार्गाच्या दुरुस्तीसाठी पुढील तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. तर खोपटे खाडी पूल दुरुस्तीसाठी पुढील चार महिन्यासाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

खोपटे कोप्रोली मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे यामार्गावरील प्रवाशांना वाहतूक कोंडी सह अपघाताचाही धोका वाढला आहे. या दोन्ही ठिकाणच्या कामांच्या दुरुस्तीच्या कामाच्या निविदा जाहीर होऊनही त्याच्या कामाला सुरुवात झालेली नव्हती. त्यामुळे येथील नागरिक,प्रवासी आणि वाहतूकदार यांच्याकडून संताप व्यक्त केला जात होता. तर उरण सामाजिक संस्थेने आंदोलनाचा इशारा दिला होता.



याची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाला सुरुवात केली आहे.

त्याचप्रमाणे खोपटे खाडी पुलावरील खड्डे दुरुस्तीसाठी आधुनिक पद्धतीने पुलाचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठीचीही निविदा मंजूर झाली आहे. या पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे. या वाढत्या खड्ड्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने जुन्या खोपटे पुलाच्या मजबुतीकरणासाठी पाच कोटी रुपयांच्या खर्चाचा आराखडा तयार केला असून या पुलाच्या दुरुस्तीला सुरुवात करण्यात आली आहे. उरण तालुक्यातील पूर्व आणि पश्चिम अशा दोन विभागांना जोडणाऱ्या खोपटे पुलाच्या दोन्ही मार्गिका खड्डेमय झाल्या आहेत. पुलावरील या खड्ड्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली होती.

**कामासाठी तीन महिने लागणार**

**खोपटे कोप्रोली मार्ग आणि खोपटे खाडी पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरूवात करण्यात आली असून यासाठी तीन महिने लागणार आहेत. हा एक किलोमीटरचा मार्ग दुरुस्त करण्यात येणार आहे. तर खोपटे पुलाचे काम चार महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहीती सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी दिली आहे.**

**खोपटे कोप्रोली मार्गाच्या दुरुस्तीला सुरुवात झाली आहे, मात्र या परिसरात ये-जा करणारी शेकडो कंटेनर वाहने अडकल्याने या मार्गावर कंटेनर वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीतही भर पडली आहे.**

**-संजय ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते, खोपटे**

या पुलावरून दररोज शेकडो अवजड वाहने वाहतूक करीत आहेत. उरणच्या दोन विभागांना जोडणाऱ्या महत्वाच्या खोपटे पुलावर ये जा करण्यासाठी दोन मार्गिका आहेत. या पुलावरील डांबरेचे थर उखडल्याने खड्डे झाले आहेत. यात जुन्या पुलावरील स्लॅब मधील लोखंडी सळया मोकळ्या झाल्या आहेत. त्या वाहनांचा टायर अडकून अपघात होण्याची शक्यता वाढली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत मोडणाऱ्या या पुलाची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

या पुलावरून अवजड वाहना बरोबरच प्रवासी वाहनेही मोठ्या प्रमाणात प्रवास करीत आहेत. या प्रवासी वाहनांना ही धोका निर्माण झाला आहे. खोपटे पूल ते कोप्रोली हा मार्ग आधीच नादुरुस्त आहे. याचा फटका येथील प्रवाशांना बसत आहे. त्यामुळे खोपटे पूल आणि मार्गाची लवकरात लवकर दुरुस्ती करा अशी मागणी प्रवाशांकडून केली जात होती.

## कारची दुचाकीला धडक, तरुणाचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चार चाकी वाहनाने भरधाव वेगाने येऊन टीव्हीएस ज्युपिटरला धडक दिली. झालेल्या अपघातात प्रमोद प्रकाश पाटील (वय ३५ राहणार किरवली, तळोजा) याचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी अनोळखी कारचालका विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात एक डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

किरवली येथील प्रमोद पाटील हा ३० नोव्हेंबर रोजी मोटरसायकल (एमएच ४६ सी क्यू २३७३) या टीव्हीएस ज्युपिटर वरून मुंब्रा पनवेल हायवे वरून किरवली गावाच्या कमानीतून गावामध्ये जात होता. शिवम ट्रान्सपोर्ट ऑफिस समोर आला असता समोरून आलेल्या फोर व्हीलरने भरधाव वेगाने येऊन त्याच्या टीव्हीएस ज्युपिटरला धडक दिली. या अपघातात प्रमोद पाटील याच्या डोक्याला आणि छातीला गंभीर जखमा झाल्या. त्यानंतर कारचालक पळून गेला. अपघातात प्रमोद पाटील यांचा मृत्यू झाला.

## पोलीस पाटील संघ घेणार पनवेल, उरणच्या आमदारांची भेट

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या माध्यमातून १० डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील पोलीस पाटील यांच्या मागण्या संदर्भात बाळासाहेब शिंदे पाटील (राज्याध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहेत.

या मोर्च्या संदर्भात महाराष्ट्र राज्यातील जिल्हा, तालुका व विभागीय पातळीवर उपविभागीय दंडाधिकारी पनवेल कार्यालय, पनवेल तहसीलदार कार्यालय, अप्पर तहसीलदार, पनवेल शहर पोलीस ठाणे, तालुका पोलीस ठाणे येथे पनवेल तालुका पोलीस पाटील संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या वेळी रायगड जिल्हा पोलीस पाटील संघाचे सचिव आणि करंजाडे पोलीस पाटील कुणाल लोंढे, पोलीस पाटील संघ उपाध्यक्ष प्रदीप पाटील, पळस्पे पोलीस पाटील एकनाथ पाटील, रायगड जिल्हा पो. पा.संघ. कार्यकारिणी सदस्य विजय खुटले, पोलीस पाटील अजिवली राजेश जाधव, पोलीस पाटील आदई कैलास गरुडे, पोलीस पाटील वडवली वसंत पाटील आदी उपस्थित होते.

**आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील यांची भेट घेऊन लवकरच पोलीस पाटील यांच्या मागण्या संदर्भात हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करावे, अशी मागणी पनवेल तालुक्यातील पोलीस पाटील यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.**

**-कुणाल लोंढे, सचिव**
**-रायगड जिल्हा पोलीस पाटील संघ**

## निवडक

### गळफास घेऊन आत्महत्या

**पनवेल :** राहत्या घरात अज्ञात कारणावरून एक १७ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याही घटना करंजाडे येथे घडली आहे. चिराग पांचाल (वय १७ रा. करंजाडे) असे या तरुणाचे नाव असून त्याने अज्ञात कारणावरून राहत्या घरात हॉलच्या गॅलरीमधील लोखंडी अँगलला कापडली दुपट्ट्याच्या साहाय्याने आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### आयफोन १७ प्रो मोबाईलची चोरी

**पनवेल :** महागड्या आयफोन १७ प्रो मोबाईलची चोरी झाल्याची घटना पळस्पे फाटा येथील एका कार्यालयात घडली आहे. मोहम्मद सलीम मोहम्मद मोहित खान (वय ३६) याचा १ लाख ४९ हजार रुपये किमतीचा अँपल कंपनीचा आयफोन १७ प्रो मोबाईल हा एस.के.टेंबर येथील शुभम पाटील याने सदर मोबाईल हा लबाडीचा इराद्याने चोरी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### आळीआंबिवली येथून मुलीचे अपहरण

**मोहोपाडा :** आळी आंबिवली येथील अल्पवयीन मुलीचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना घडली आहे. याबाबत रसायनी पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या आईने फिर्याद दाखल केली आहे. त्यांची १५ वर्षीय ५ महिने वयाची अल्पवयीन मुलगी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेली असल्याची तक्रार त्यांनी केली आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अनुसया ढोणे या करीत आहेत.

## सीकेटी कॉलेजमध्ये स्किट प्ले स्पर्धा आणि अतिथी व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय येथे विज्ञान संघटना यांच्या मार्फत एचआयव्ही / एड्स जागरूकता आणि प्रतिबंध या विषयावर स्किट प्ले स्पर्धा सोमवार, १ डिसेंबर २०२५ आणि अतिथी व्याख्यान शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५ सकाळी १२ वाजता आयोजन करण्यात आले होते.



१ डिसेंबर २०२५ रोजी एड्स दिन निमित्त एचआयव्ही / एड्स जागरूकता आणि प्रतिबंध या विषयावर स्किट प्ले स्पर्धा घेण्यात आली त्यास्पर्धेसाठी सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रा. एन. पी. तिदार व संस्कृतिक विभागाचे प्रा. गणेश जगताप हे परीक्षक म्हणुन लाभले. ५ डिसेंबर २०२५ च्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अपोलो हॉस्पिटल, नवी मुंबई यांच्या प्रभारी अपोलो ब्लड सेंटर व कन्सल्टंट ट्रान्सफ्यूजन मेडिसिन डॉ. दिपाली पाटील या उपस्थित होत्या. तसेच महाविद्यालायचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.एम.ए.म्हात्रे व विज्ञान संघटनेच्या प्रमुख प्रा. डॉ. वाय. एस. मुनीव यांनी उपस्थिती दर्शविली.त्याचबरोबर जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रा. डॉ. अनुप्रिता वाठारकर यांनी प्रमुख पाहुणे डॉ. दिपाली पाटील यांचा परिचय उपस्थितांना करून दिला.

प्रमुख पाहुणे प्रा डॉ. दिपाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, एचआयव्ही / एड्स हे दोन वेगवेगळे घटक आहेत. ज्यांना एचआयव्ही / एड्स बद्दल माहित आहे त्यांनी नेहमी सकारात्मक माहिती द्यावी. जसे एचआयव्ही / एड्स हा आजार संक्रमित जोडीदारासोबत असुरक्षित लैंगिक संबंध, इंजेक्शनच्या सुया शेअर करणे, संक्रमित आई कडून गर्भाला होणारा संसर्ग आणि रक्त संक्रमनामधून होणारा संसर्ग अश्या कारणांमुळे होतो. तसेच एचआयव्ही / एड्स हा एकच फक्त संसर्ग जन्या आजार नसून असे खूप सारे आजार आहे जसे सारख्याच कारणांमुळे पसरणारे आजार म्हणजे हॅपेटायटिस बी, हॅपेटायटिस डी, मलेरिया इत्यादी त्याचबरोबर त्यांनी एचआयव्ही / एड्स होण्या मागील कारणे आणि विंडो पिरेड म्हणजे काय हे देखील सांगितले. त्यामुळे उपचारापेक्षा खबरदारी चांगली असे विद्यार्थ्यांना उद्देशुन सांगितले. तसेच या कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान विभागाची विद्यार्थिनी सिद्धी मुंढे हिने केले. तसेच १ डिसेंबर २०२५ झालेल्या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रा. एम. डी. वैशंपायन आणि ५ डिसेंबर २०२५ झालेल्या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन रसायनशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. शाहीन शैख यांनी केले. त्याचबरोबर या कार्यक्रमामध्य स्किट प्ले स्पर्धातील प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

## एमएनएम विद्यालयात पालक शिक्षक सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या, शैक्षणिक, तसेच सर्वांगीण प्रगतीसाठी, शिक्षक पालक यांच्यातील संवाद आणि समन्वय वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने शैक्षणिक वर्षातील तिसऱ्या शिक्षक पालक सहविचार सभेचे आयोजन जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालयात करण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी उपस्थित सर्व पालक प्रतिनिधींचे स्वागत केले. बैठकीच्या सुरुवातीला मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले तसेच शाळेतील नियम, अभ्यासक्रमाचे नियोजन, विद्यार्थी शैक्षणिक प्रगती याबद्दल चर्चा करण्यात आली. शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी शाळेच्या शालेय व सहशालेय उपक्रमांची माहिती पालक प्रतिनिधींना स्लाईड शोच्या मार्फत दाखविली.

प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी शालेय शैक्षणिक वर्षांमध्ये दुसऱ्या सत्रा अंतर्गत होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेचे अभ्यास वर्ग, वार्षिक क्रीडा महोत्सव, वार्षिक स्नेहसंमेलन व इतर सहशालेय विविध उपक्रमांची माहिती पालकांना दिली सभेसाठी उपस्थित पालकांचे आभार प्रगती देशमुख यांनी व्यक्त केले.



## रसायनी पोलीस ठाण्यात दत्त जयंती उत्साहात

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

रसायनी परिसरात श्री दत्त जयंतीचा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून गुरुवार, ४ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आले होते. या निमित्ताने संपूर्ण परिसरात भाविकांमध्ये भक्तीमय वातावरण पहायला मिळाले.

रसायनी मधील रसायनी पोलीस ठाणे येथील दत्त मंदिरामध्ये श्री दत्त जयंती उत्सव २०२५चे भव्य आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाला डॉ. विशाल नेहूल उप विभागीय पोलीस अधिकारी खालापूर यांनी विशेष भेट देऊन श्री दत्तगुरूंचे मनोभावे दर्शन घेतले. दरवर्षीप्रमाणे यंदाही रसायनी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलीस ठाणे येथील दत्त मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये श्रीं चा अभिषेक, होम हवन, श्री सत्यनारायणाची महापूजा, भजन, श्री दत्त जन्म आणि महाआरती यासारख्या धार्मिक विधींचा समावेश होता तसेच जय भवानी भजन मंडळ वडगाव.

हभप राजेंद्र महाराज जांभुळकर यांचे भजन रुपीसेवा पार पडली. या उत्सवाला परिसरातील भाविकांनी भेट देऊन श्री दत्तगुरुंचे दर्शन घेतले रसायनिक पोलीस ठाण्यातील दत्त मंदिर भाविकांच्या गर्दीने फुलवून गेला होते.



## खारघरमध्ये गीता जयंतीनिमित्त मोफत भगवद्गीतेचे वितरण





**खारघर : रामप्रहर वृत्त**

गीता जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही इस्कॉन मंदिर, नवी मुंबई यांच्या वतीने १५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत भव्य भगवद्गीता वितरण उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा एकत्भाग म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील लोकनेते रामशेठ ठाकूर शाळेत विशेष कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना मोफत भगवद्गीतेचे वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांना संस्कृती, नैतिकता आणि जीवनमूल्यांचे मार्गदर्शन करणारा हा पवित्र ग्रंथ उत्साहात प्रदान करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान शाळेतील शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी भगवद्गीतेचा मनोभावे स्वीकार करत ज्ञानदान उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. गीतेतील शिकवणी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास मोठी मदत करते, अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांमध्येही या ग्रंथाबद्दल कुतूहल आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. या वेळी पनवेल शहर मंडल भाजप युवा मोर्चाचे सरचिटणीस अक्षय सिंह विशेष उपस्थित होते.



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरी सोहळ्याचे उद्घाटन पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अभिनेते गिरीश ओक, दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, अभिनेते सुनील तावडे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले.**

## संपादकीय

# धोरण स्वायत्तता कायम

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या भारतभेटीकडे अवघ्या जगाचे व विशेषत: अमेरिका व चीनचे लक्ष लागले होते. भारताच्या रशियाशी असलेल्या पारंपरिक मैत्रीच्या पार्श्वभूमीवर त्या देशाकडून तेलखरेदी न करण्यासंदर्भात अमेरिकेने भारतावर मोठा दबाव आणला. पण रशियासोबतच्या मैत्रीला नव्याने बळकटी देऊन भारताने आपली धोरण स्वायत्तता कायम असल्याचे जगाला दाखवून दिले आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करून रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन हे भारतभेटीस आले. पुतीन यांच्या भारतभेटीत उभय देशांमध्ये अनेक महत्त्वाचे करार झाले असून त्यांच्या या भारतभेटीकडे अवघ्या जगाचे लक्ष आहे. यात विशेषत: अमेरिका व चीन यांचा उल्लेख करावा लागेल. भारत आणि रशिया हे पारंपरिक मित्र असले तरी पुतीन यांच्या ताज्या भारतदौऱ्याचे महत्त्व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिकोनातूनही फार मोठे आहे. आपली धोरणात्मक स्वायत्तता आपण टिकवून आहोत हा फार महत्त्वाचा संदेश भारताने पुतीन यांच्या या भेटीतून जगाला दिला आहे. भारताने रशियाकडून खनिज तेल खरेदी करू नये यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर बराच दबाव आणला. त्याकरिता ट्रम्प यांनी भारतावर पन्नास टक्के आयातशुल्कही लादले. रशिया तेलविक्रीतून मिळणारा पैसा युक्रेनविरुद्धच्या युद्धात वापरतो आहे. त्यामुळे भारताने ही तेलखरेदी थांबवावी असे ट्रम्प म्हणत होते. भारताने हा सारा दबाव धुडकावून लावला आहे हे मोदी आणि पुतीन यांच्या शुक्रवारच्या भेटीतून स्पष्ट झाले आहे. सध्या जागतिक राजकारणात पुतीन यांना अमेरिका आणि युरोपीय देशांनी वेगळे पाडले असले तरी पुतीन यांची भारतभेट अमेरिकेसह पश्चिमी देशांनाही एक इशारा मानली जाते आहे. पश्चिमी देशांचा जागतिक राजकारणावरील प्रभाव ओसरतो आहे हेही यातून दिसते. अमेरिकेकडून रशियावरही असंख्य निर्बंध लादले गेले आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व प्रोटोकॉल बाजूला ठेवून पंतप्रधान मोदी स्वत: पुतीन यांचे स्वागत करण्यासाठी विमानतळावर गेले. शुक्रवारी मोदी व पुतीन यांच्या उपस्थितीत भारत–रशिया वार्षिक शिखर परिषद झाली व दोन्ही देशांदरम्यान अनेक क्षेत्रांशी संबंधित महत्त्वाचे करार झाले. करारांमध्ये कामगार स्थलांतर, आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण, अन्नसुरक्षा, जहाजबांधणी, रसायने आणि खते आदींशी संबंधित करारांचाही समावेश आहे. याखेरीज रशियाच्या नागरिकांसाठी भारताने ई–टूरिस्ट व्हिसा सुरू केल्याची घोषणाही केली. दुसऱ्यांदा अमेरिकेच्या अध्यक्षपदी आल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी केवळ अमेरिकेच्या हिताची धोरणे राबवण्याचा व त्याकरिता प्रसंगी आंतरराष्ट्रीय संबंधांनाही धक्का पोहोचवण्याचा सपाटा लावला आहे. या आततायी कार्यशैलीत त्यांनी अनेक देशांवर दबाव आणला आहे. भारतही त्यातलाच एक देश आहे. याच पार्श्वभूमीवर भारत व अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार करारही रखडला आहे. आपल्या दबावामुळे भारत रशियापासून दुरावेल असे कदाचित ट्रम्प यांना वाटले असावे. परंतु भारताने आपण आपल्या परराष्ट्र धोरणात स्वायत्तता पूर्णपणे टिकवून आहोत हे स्पष्टपणे दाखवून दिले आहे. भारताला अमेरिकेशी मैत्रीसंबंध व सहकार्यही हवेच आहे. पण त्यासाठी भारत आपली धोरण स्वायत्तता पणाला लावणार नाही. पुतीन यांच्या भारतभेटीने उभय देशांदरम्यानचे मैत्रीसंबंध नक्कीच आणखी मजबूत होणार आहेत. अंतराळ संशोधन, संरक्षण, ऊर्जा, व्यापार आदी क्षेत्रांसंदर्भात उभय देशांमध्ये दीर्घ काळ सहकार्य होत आले आहे. परस्पर सहकार्यातून दोन्ही देशांची भविष्यातील वाटचाल समृद्ध होईल यात शंका नाही.**

# महाडमध्ये वाळू, माती आणि दगड विक्री चोरी प्रशासनाचे दुर्लक्ष

**खबरबात**
महेश शिंदे

महाड तालुक्यात गेली कांही वर्ष बिनदिक्कत आणि महसूल नियम पायदळी तुडवत मोठ्या प्रमाणात वाळू, माती आणि डबर उत्खनन होत आहे. केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत स्थानिक महसूल विभागया उत्खनन करणाऱ्यांना पाठीशी घालत आहे. अधिकारी आणि वाळू,माती, डबर उत्खननकरणाऱ्यांचे यामुळे चांगलेच फावले आहे.

ऐतिहासिक महाडतालुक्यात गेली कांही वर्षापासून सर्वच शासकीय नियम धाब्यावर बसवून बिनदिक्कतनैसर्गिक साधन संपत्तीचे नुकसान केले जात आहे. तालुक्यातील निसर्गिक सौंदर्य लक्षातन घेता वारेमाप उत्खनन करणाऱ्या लोकांना प्रशासन पाठबळ देत आहे. तालुक्यात गेलीअनेक वर्षापासून वाळू उत्खनन मोठ्या प्रमाणावर होत आहे. येथील सावित्री, काळ,गांधारी, आणि सावित्री खाडी या नद्यांमधून हे उत्खनन केले जात आहे. यापूर्वी ड्रेजरद्वारे वाळू उपसा करण्यास परवानगी दिली जात होती. शिवाय स्थानिक नागरिकांना रोजगारउपलब्ध व्हावा म्हणून हातपाटी द्वारे उत्खनन करण्यास परवानगी दिली जात होती. यातून शासनाला देखील मोठ्या प्रमाणात कर मिळतहोता. मात्र कालांतराने यात बदल होत गेले आणि या वाळू उत्खननावर निर्बंध आले.मात्र हे निर्बंधच वाळू उत्खनन करणाऱ्यांसाठी आणि स्थानिक अधिकाऱ्यांसाठी फायदेशीरझाले. तालुक्यात गेली अनेक दिवसांपासून सावित्री, काळ, गांधारी नदीत मोठ्याप्रमाणात वाळू उपसा केला जात आहे. हातपाटी साठी कांही प्रमाणात मंजुरी दिली असलीतरी याठिकाणी देखील प्रमाणापेक्षा अधिक वाळू उपसा केला जात आहे. महाड परिसरातविविध ठिकाणी अशा प्रकारे उपसा सुरु असून उपसा केलेली वाळू





पहाटेच्या सुमारासलंपास केली जात आहे. हीच अवस्था माती उत्खननाबाबत देखील असून संपूर्ण परिसरातमोठ्या प्रमाणात मातीचे उत्खनन आणि भराव केले जात आहेत. महसूल अधिकारी, स्थानिकतलाठी यांच्याशी संगनमत करून जुन्याच रॉयल्टीच्या आधारे माती उत्खनन केले जात आहे.भर दिवसा हे उत्खनन होत असताना स्थानिक तलाठी मात्र डोळ्यावर काळा चष्मा घालून दुर्लक्षकरतात.अशाच प्रकारेमहाड जवळ असलेल्या कांबळे तर्फे महाड या गावाशेजारी नदीत वाळू उपसा होत असल्याचीतक्रार स्थानिक ग्रामस्थांनी तक्रार केल्यानंतर महसूल विभागाचे अधिकारी जाग्यावरजावून आले. वाळूचा ढीग जप्त केला मात्र उत्खनन करण्यासाठी वापरली गेलेली यंत्रसामग्री मात्र सोडून देण्यात आली. याच ठिकाणी आजही असेच उत्खनन बिनदिक्कत सुरुअसल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. याबाबत तहसीलदार महेश शितोळे यांच्याकडेतक्रारी होत असल्या तरी त्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे स्पष्ट होत आहे.महाड तालुक्यात विविध ठिकाणी माती उत्खनन देखील अशाच प्रकारे सुरु आहे. महाडतालुक्यात सुरु असलेल्या माती भरावासाठी जुन्याच रॉयल्टी चा आधार घेतला जात आहे.काढण्यात येणाऱ्या परवानगी पेक्षा अधिक ब्रास माती उत्खनन करण्यास महसूलकर्मचाऱ्यांचा हाथ आहे. विविध इमारत प्रकल्प, जमीन सपाटीकरण यासाठी माती उत्खननहोत आहे. किल्ले रायगडाच्या परिसरात देखील नैसगिक साधनसंपत्ती नष्ट करत मातीउत्खनन करत जमीन सपाटीकरण करण्याचा सपाटा स्थानिकांनीच लावला आहे. ऐतिहासिकदृष्ट्या महत्व असलेल्या या परिसराचा देखील विचार न करता वाटेल तसे बांधकाम आणिमाती उत्खनन होत आहे.

तालुक्यात डोंगरपरिसरात दगड खाणींना परवानगी दिली आहे. तालुक्यात जवळपास दहा हून अधिक दगड खाणीआहेत. या दगड खाणी प्रामुख्याने झाडाझुडपांच्या क्षेत्रात आहेत. मात्र या वृक्ष संपत्तीचादेखील विचार न करता डबर, खडी, काढली जात आहे. नैसर्गिक दृष्ट्या महत्वपूर्णअसलेल्या परिसरात सुरुंग लावला जात आहे. गेली वर्ष भरात महसूल विभागाने कोणतीचपरवानगी दिली नव्हती मात्र दगड खाणींतून सुरुंगाचे आवाज निघतच होते. परवानगीनसताना बिनदिक्कत दगड, कपची, खडी विक्री मोठ्या प्रमाणात केली गेली आहे. शासनाच्याखनिकर्म विभागाने याबाबत यंत्राच्या सहाय्याने मोजणी देखील केली आहे मात्र यामोजणीचा अहवाल लाल फितीत बांधून ठेवला आहे. गेल्या वर्षी झालेली मोजणी आणि सद्यस्थितीतील उत्खनन याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्तकेले आहे. शेजारील मंडणगड, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यात देखील तीच अवस्था आहे.कृत्रिम वाळूप्रकल्पांना देखील अशाच प्रकारे परवाने दिले आहेत. प्रमाणापेक्षा अधिक वाळूचेनिर्माण या कृत्रिम वाळू प्रकल्पात केले जात आहे. महाड तालुक्यात आणि महाडतालुक्याच्या हद्दीलगत माणगाव महसूल विभागाच्या अंतर्गत असलेल्या कृत्रिम वाळूप्रकल्पात अशीच अवस्था आहे. याकडे देखील स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.शासनाच्या वतीने या दोन्ही तालुक्यातील वाळू, माती, आणि दगड खाणीचे सर्व्हेक्षणहोणे आवश्यक आहे त्यानंतर दोषींवर कारवाई होणे आवश्यक आहे अशी मागणी पर्यावरणतज्ञांकडून होत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### मोबाइल सायबर हल्ले वाढताहेत; अनेक ॲप्स धोकादायक!

भारतीयांच्या मोबाइलवर सध्या जगात सर्वाधिक हल्ले होत असून याद्वारे खासगी माहिती चोरण्यासह आर्थिक गंडाही घातला जात आहे. ‘जेडस्केलर थ्रेटलॅब्ज २०२४ मोबाइल, आयओटी अँड ओटी थ्रेट’ अहवालात समोर आले आहे.



या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, भारत हे मोबाइल मालवेअर हल्ल्यांचे सर्वात मोठे लक्ष्य बनले आहे. जून २०२३ ते मे २०२४दरम्यान जगभरातील सर्व मोबाइल मालवेअर हल्ल्यांपैकी सर्वाधिक २८ टक्के भारतात झाले. यानंतर अमेरिकेत २७.३ टक्के आणि कॅनडात १५.९ टक्के हल्ले झाले.

अहवालात बँकिंग मालवेअर हल्ल्यांमध्ये २९ टक्के आणि मोबाइल स्पायवेअर हल्ल्यांमध्ये १११ टक्के वाढ झाल्याचे समोर आले आहे. भारतीय टपाल सेवाही सायबर हल्लेखोरांचे लक्ष्य बनली. दरम्यान, एसएमएस वापरून हल्लेखोर मोबाइल युजर्सना फिशिंग साइट्सना भेट देण्यासाठी सांगतात. जे त्यांना क्रेडिट कार्ड डिटेल्स प्रविष्ट करण्यास सूचित करतात.

**मालवेअर, स्पायवेअर काय?**


‘मालवेअर’ हे सॉफ्टवेअर मोबाइल किंवा संगणकावर एखाद्याची ओळख चोरण्यासाठी किंवा गोपनीय माहिती चोरण्यासाठी वापरले जाते. स्पायवेअर हा मालवेअरचा एक प्रकार आहे. याद्वारे एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती त्याच्या नकळत मिळवली जाते.

**बँक ग्राहकांनो, सावधान!**

थ्रेटलॅब्ज विश्लेषकांच्या मते, एचडीएफसी, आयसीआयसीआय आणि ॲक्सिससारख्या प्रमुख भारतीय बँकांच्या मोबाइल ग्राहकांना लक्ष्य करून फिशिंग केले जात आहे. या बँकांच्या ग्राहकांवरील हल्ले वाढले आहेत. २००हून अधिक ॲप्स धोकादायक! अभ्यासात गुगल प्ले स्टोअरवर २००पेक्षा अधिक असे ॲप्स आढळून आले आहेत, जे सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक आहेत.

दरम्यान, हल्ली मोबाईलचा वापर सर्रास वाढला आहे. लहान मुलांपासून वयोवृद्ध मंडळींपर्यंत सर्वच जण मोबाईलचा वापर वेगवेगळ्या कारणांसाठी करतात. हे लक्षात घेत काही लोक मोबाईलधारकांना लक्ष्य करून फसवणूक करीत असतात. अशांपासून सावध राहिले पाहिजे.

# कवी नारायण वामन टिळक



**निमित्त**

फुला–मुलांचे कवी व संतकवी म्हणून प्रसिद्ध असलेले रेव्हरंड नारायण वामन टिळक यांची आज जयंती. त्यांचा जन्म ६ डिसेंबर १८६१ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील करंजगाव येथे. बालपणाचा काही काळ तेथेच गेला. शिक्षण कल्याण व नाशिक येथे इंग्रजी पाच इयत्तांपर्यंत झाले. तेथील वास्तव्यात गणेशशास्त्री लेले यांच्याकडे त्यांनी संस्कृताचे अध्ययन केले. तेथे काव्याची गोडी लागली. आई जानकीबाई यांना पद्यरचनेची आवड होती. तिच्यापासून आपणास काव्यशक्ती लाभली अशी टिळकांची श्रद्धा होती.


१८८०मध्ये लक्ष्मीबाई टिळक यांच्याशी विवाह झाला. पुढे अकरा वर्षे नागपूर, वणी, मुंबई, मुरबाड इ. ठिकाणी कीर्तनकार, पुराणिक, शिक्षक, जुळारी असे विविध प्रकारचे व्यवसाय केले. पुढे राजनांदगाव येथे नोकरीनिमित्त जात असता एका ख्रिस्ती गृहस्थाची गाठ पडली आणि ते ख्रिस्ती धर्माचा अभ्यास करू लागले. त्या धर्मावर पूर्ण श्रद्धा बसल्यानंतर १८९५मध्ये ते ख्रिस्ती झाले व आमरण त्या धर्माचे कार्य त्यांनी केले. हे त्यांचे कार्यही वैशिष्ट्यपूर्ण होते. ते स्वतः भजन–कीर्तने करीत व इतर ख्रिस्ती बंधूंना कीर्तनाची साथ देत, मार्गदर्शन करीत. ‘रेव्हरंड’ ही ख्रिस्ती धर्मातील उपाधीही त्यांना मिळाली. ‘रेव्हरंड टिळक’ या नावाने ते महाराष्ट्रात ख्यात होते. रेव्हरंड टिळक हे कवी म्हणून प्रसिद्ध असले तरी त्यांनी स्फुट गद्यलेखनही विपुल केलेले आहे.

प्रथम हिंदू धर्मास अनुकूल आणि पुढे ख्रिस्ती धर्मपुरस्कारार्थ त्यांनी केलेल्या लेखनाचा त्यात अंतर्भाव होतो. केशवसुतांच्या आधी त्यांनी काव्यरचनेस आरंभ केला. प्रथम जुन्या पद्धतीच्या, दीर्घ कथनपर काव्यरचनेवर त्यांचा भर होता. तथापि पुढे केशवसुतांच्या नव्या, आधुनिक कवितेचे वातावरण निर्माण झाल्यानंतर त्या प्रकारची कविता लिहिण्याकडे त्यांची प्रवृत्ती झाली. साधी, सहज रचना आणि प्रामाणिक भावनोत्कटता हे त्यांच्या काव्यरचनेचे विशेष होते. तथापि एक प्रकारची व्यापक कुटुंबवत्सलता त्यांच्या एकूण कवितेला व्यापून राहिल्याचे जाणवते. त्यातूनच बालोद्यानमधील त्यांची शिशुगीते लिहिली गेली. बालकवींचे स्वतःच्या घरात उत्कट जिव्हाळ्याने केलेले पालन या संदर्भात बोलके ठरते. निसर्गाबद्दल त्यांना प्रेम वाटे. ‘फुलामुलांचे कवी’ म्हणूनच ते ओळखले जातात. ‘गुलाब’, ‘शुष्क गुलाब’, ‘रानात एकटेच पडलेले फूल’, ‘वनवासी फूल’ ह्यांसारख्या कविता त्यांनी लिहिल्या आहेत. तथापि त्यांच्या कवितेतून अवतरणारी फुले ही निखळ निसर्गाविष्कारासाठी येत नाहीत, तर बोधप्रवण तत्त्वचिंतनासाठी येतात.

भारतीय ख्रिस्ती समाजात पुराणाची पद्धत लोकप्रिय करण्याच्या दिशेने त्यांचा हा एक प्रयत्न होता. तथापि त्याचे पहिले साडेदहा अध्यायच ते पूर्ण करू शकले. नंतरची काव्यरचना त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई आणि पुत्र देवदत्त यांनी पूर्ण केली. ख्रिस्ती झाल्याने टिळकांचा मायदेशाचा आणि मायभाषेचा अभिमान सुटला नाही. महाराष्ट्रात ख्रिस्ती झालेल्या लोकांची भाषा व साहित्य मराठीच राहण्यास टिळकांचे लेखन बरेच कारणीभूत झालेले आहे. मुंबई येथे ९ मे १९१९ रोजी ते निधन पावले.

**–रा. श्री. जोग (विकासपीडिया)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### फिट राहायचेय तर ‘या’ पदार्थांचा वापर करा!

आजकल बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांचे वजन वाढत आहे. त्यामुळे फिगर चांगली व्हावी म्हणून अनेकजण फिटनेस सेंटरमध्ये घाम गाळत आहेत, परंतु कार्यालयातील बैठे काम आणि फास्टफूडचा वापर यामुळे वजनवाढ आणि बेढब शरीर ही आजकाल सर्वसामान्य समस्या झाली आहे. लठ्ठपणा ही जगभरातील समस्या बनली असून त्यामुळे अनेक आजार शरीरात घर करुन राहीले आहेत. काही वनस्पती देखील वजन कमी करण्यास मदत करीत असतात. त्या कोणत्या ते पाहूयात..



जगभरातील लठ्ठपणामुळे जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. अनेकांना बदलत्या जीवनशैलीमुळे व्यायामासाठी वेळ काढता येणे अशक्य झाले आहे. त्यांच्यासाठी या सहा वनस्पती कामी येणाऱ्या आहेत.

त्रिफळा – त्रिफळा हे नावावरुनच तीन फळांचे मिश्रण असते. यात आमलकी, बिभीतकी आणि हरितकी या फळाचे मिश्रण असते. त्रिफळा आरोग्यासाठी खूपच गुणकारी आहे. याला पचन समस्येसाठी वापरले जाते. यामुळे पचनआणि एलिमिनेशन यात सुधारणा होऊन वजन घटविण्यास मदत मिळते.

बडीशेप – बडीशेप आपण जेवणानंतर माऊथफ्रेशनर म्हणून वापरत असतो. बडीशेफ ही वजन घटविण्यासाठी देखील फायदेशीर आहे. यात विरघळणारे फायबर आढळते. त्यामुळे आपल्याला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते. यामुळे भूक कमी होते. आणि पचन यंत्रणेत सुधारणार होते. त्यामुळे बडीशेफ खाण्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.

दालचिनी – दालचिनी ही मसाल्यात वापरली जाते. प्रत्येक भारतीय घरात दालचिनी असते. यात थर्मोजेनिक गुणधर्म असतात. जे मेटाबॉलीजम वाढवितात, तसेच चरबी जाळण्यास मदत करतात.

हळद – हळदीत अनेक औषधी गुणधर्म आहे. अनेक भारतीय पदार्थांत हळद वापरली जाते. यातील एक्टीव्ह करक्यूमिनमध्ये ॲण्टी इफ्लेमेटरी गुण आढळतात. जे चरबी जमा होण्यास रोखतात.

मेथीदाणे – मेथीदाणेदेखील वजन कमी करण्यासाठी वापरतात. यातदेखील मोठ्या प्रमाणावर फायबर असते.त्यामुळे ते आपल्याला खूप काळ भूक लागू देत नाहीत. तसेच मेथीदाण्यांचा डाएटमध्ये समावेश केल्याने ब्लड शुगर लेव्हल देखील कंट्रोलमध्ये राहाते.

# कालवा सफाईच्या नावे माणगावमध्ये वृक्षांची कत्तल

**माणगाव : बातमीदार**



माणगावात आता एकमेव शिल्लक असलेला हरित पट्टा म्हणेज शहराच्या मध्यभागी असलेला कालव्याचा परिसर, आजपर्यंत माणगाव नगर पंचायत मार्फत देखील कोणतेही पर्यावरणपूरक धोरण न राखता कधीही शहरातल्या वृक्षांची नोंद किंवा टिप्पणी करून कोणत्याही प्रकारचे सर्वेक्षण येथे झालेले नाही.

साधारणतः उन्हाळी कालवा सोडण्याच्या पूर्वी डिसेंबर-जानेवारी महिन्यात कालवा साफसफाईचा उपक्रम शासनाकडून हाती घेतला जातो, पण कालवा साफसफाई म्हणजे काय तर कालव्याच्या आजूबाजूची सगळी नैसर्गिक रित्या उगवलेली झाडे तोडली जातात. असंख्य झाडे यांत्रिकी दृष्ट्या सध्या तोडली जात आहेत, यंत्रामुळेच ओरबाडून कालव्याच्या बांधाचे देखील नुकसान होत आहे, साधारण एक-दोन दिवस ते जास्तीत जास्त सात दिवस हा साफसफाईचा कार्यक्रम यांत्रिकी दृष्ट्या येथे चालतो सर्व आजूबाजूच्या झाडांची कत्तल येथे पद्धतशीरपणे होते.

कालवा परिसरात संपूर्ण झाडे नैसर्गिकरित्या उगवतात येथे कोणतेही वृक्षारोपण करावे लागत नाही, परंतु गेल्या काही वर्षांमध्ये पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आणि टेंडर मिळवलेल्या सफाई करणाऱ्या ठेकेदाराकडून कडून विनाकारण, पिंपळ, उंबर, वड आणि इतर मोठ्या झाडांची देखील कत्तल केली गेल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अनावश्यक रानमोडी सारखे तण(विड) वाढून, परिसरातील जैवविवीधता आता धोक्यात आली आहे, देशी स्थानिक झाडे ओळखून कालव्याच्या किनारून त्यांना वाढून दिल्यास येथे कोणत्याही प्रकारचे खर्चिक वृक्षारोपण करण्याची देखील गरज नाही परंतु वृक्षारोपण करू शकलो तर माणगावच्या मधोमध अगदी एक खूप सुंदर असे स्वयंपूर्ण कालवा उद्यान तयार होऊ शकते, असे माणगावचे पर्यावरण अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी सांगितले आहे.

माणगांव तालुक्यात काही गावांमध्ये तर पिण्याच्या पाण्यासाठी देखील कालव्याच्या पाण्याचा वापर तसेच प्रसंगी माणगांव शहरातदेखील काळनदीची पाण्याची पातळी कमी झाली कि नदीत कालव्याचे पाणी सोडले जाते, पण शहरामधून आपलीच माणसं त्यामध्ये कचरा करत आहेत. आपल्या कालव्याची दुर्दशा आपणच लावत आहोत, याकडे दुर्लक्ष करून लोकप्रतिनिधीमात्र मूक गिळून गप्प आहेत. कोट्यवधींची पाणी पुरवठा योजना सध्या माणगांवात सुरु आहे, पण पाणीच शुद्ध नसेल तर हि योजना कुचकामी असल्याचे नागरीक बोलत आहेत.

यावर्षी अतिवृष्टीमुळे पावसाळी भातशेतीचे फार मोठे नुकसान झाले आहे, आता तरी उन्हाळी शेती लक्षात घेता या कालव्याचे जतन डागडुजी करुन तसेच येथील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संबंधीत शासन व लोकप्रतिनिधी या कालव्याकडे लक्ष देतील का? हाच खरा सवाल आहे.

## 'रस्त्याच्या दोन्ही बाजूची झुडपे तत्काळ काढून टाका'

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील शिघ्रे केळघर रोहा मार्ग व ऊसरोली सुपेगाव मार्गे रोहा या मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूस मोठे गवत व झुडपे वाढलेली आहेत. त्यामुळे वाहकांना समोरून येणाऱ्या वाहनांचे स्पष्ट न दिसल्याने या रस्त्यावर वारंवार अपघात होत आहेत. मुरुड सार्वजनिक बांधकाम खात्याने सदरील सर्व गवत व झुडपे तातडीने काढून टाकावीत व वाहन चालकाना दिलासा द्यावा अशी आग्रही मागणी माजी आमदार पंडितशेठ पाटील यांनी केली आहे.

भाजपचे जिल्हा युवक अध्यक्ष नंदेश यादव, माजी सरपंच रमेश दिवेकर, एम. एम. ठाकूर, धर्मा हिरवे, राजेश दिवेकर, विजय म्हात्रे आदी मंडळींनी माजी आमदार व भाजप नेते पंडितशेठ पाटील यांची भेट घेऊन सदरील रस्त्याची व्यथा त्यांच्याकडे मांडली. या रस्त्यावर नुकताच एक अपघात होऊन मोटार सायकल वरील पती पत्नी यांचा अपघात होऊन त्याच्या पायास गंभीर दुखापत झाली आहे. हे सर्व माजी आमदार पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले.

यावर तातडीने स्थानीक पत्रकार यांना बोलावून या रस्त्यांबाबत आपले मत प्रदर्शित करून सार्वजनिक बांधकाम खात्यास इशारा देऊन जनादोलन करण्याचा इशारा सुध्दा यावेळी पाटील यांनी दिला.

पावसाळा समाप्त होताच सार्वजनिक बांधकाम खात्याकडून गवत, झुडपे व वाढलेली झाडे जी रस्त्याच्या मधोमध येऊन वाहतुकीस अडथळा होत असेल तर ती तोडण्यात येत असत.

## नागोठण्यात श्रीदत्त जयंती भक्तिमय वातावरणात साजरी



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर परिसरातील श्रीदत्त मंदिर, नागोठणे खडक आळीतील श्री स्वामी समर्थ मठ,नागोठणे रामनगर येथील श्री साईबाबा मंदिर तसेच नागोठणे पोलिस स्टेशन मधील श्रीदत्त मंदिर येथे श्रीदत्त जयंती अतिशय भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. श्रीदत्त जयंती निमित्त हजारो भक्तगणांनी श्री दत्त महाराज, श्री स्वामी समर्थ महाराज, श्री साईबाबा यांचे दर्शन घेऊन पुजा अर्चा करून महाप्रसादाचा लाभ घेतला.

नागोठणे खडक आळीतील श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या मठात श्रीदत्त जयंती निमित्त दिवसभर स्वामींचे दर्शन आणि पारायण चालू होते. सकाळपासून स्वामीभक्त जप करत होते. श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या मठात संध्याकाळी साडेसहा वाजता असंख्य स्वामी भक्तांच्या उपस्थितीत श्री स्वामी महाराजांची आरती घेण्यात आली. त्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. अशा प्रकारे नागोठण्यात भक्तिमय वातावरणात श्री दत्त जयंती साजरी करण्यात आली.

## महात्मा गांधी विद्यालयात अखंड वाचनयज्ञाचे आयोजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानने वतीने ५ व ६ डिसेंबर रोजी सलग ३६ तास व एकत्रित ३०० तास अखंड वाचनयज्ञ उपक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमांतर्गत अलिबाग तालुक्यातील हाशिवरे हितवर्धक मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयात ५ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी विशेष वाचन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

अक्षरमंच प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ योगेश जोशी यांच्या संकल्पनेतून अखंड वाचनयज्ञ या उपक्रमाचे आयोजन मागील तीन वर्षांपासून करण्यात येत आहे. दरवर्षी या उपक्रमामध्ये एक हजार ५०० हून अधिक वाचक व्यासपीठावर येऊन वाचन करीत असतात. हाशिवरे हितवर्धक मंडळाचे सचिव अनिल मोकल यांच्या प्रयत्नातून अखंड वाचनयज्ञ कार्यक्रमात महात्मा गांधी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते बारावी मधील १०१ हून अधिक विद्यार्थी व्यासपीठावर येऊन प्रत्यक्ष कथा, कविता, लेख यांचे अभिवाचन करणार आहेत.

सदर कार्यक्रमासाठी हाशिवरे हितवर्धक मंडळ सल्लागार सुबोध मोकल, कार्यकारिणी सदस्य निशिकांत मोकल, कवी दिलीप मोकल, मिलिंद मोकल हे उपस्थित राहणार आहेत. डॉ योगेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, हाशिवरेचे प्राचार्य बी. डी. गायकवाड, पर्यवेक्षक एन. डी. प्रबळकर, वैजाळी इंग्लिश मिडीयम स्कूल हाशिवरेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा म्हात्रे व शिक्षक बी. जी. शिकारे यांच्या पुढाकारातून हा अभिवाचन उपक्रम राबविला जात आहे.

वाचन संस्कृती वाढीस लागावी या हेतूने अक्षरमंच प्रतिष्ठानचे वतीने विनामूल्य आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामध्ये वाचन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

## माथेरान रेल्वे स्थानकात पीरभॉय यांचे फोटो

**माथेरान : बातमीदार**




माथेरान मिनी ट्रेनचे जनक स्वर्गीय आदमजी पीरभॉय व त्यांचे सुपुत्र अब्दुल हुसेन आदमजी पीरभॉय यांचे फोटो पूर्वी माथेरान रेल्वे स्टेशन येथे लावलेले होते. या माथेरान मिनिट्रेन करिता त्यांनी केलेले कार्य येणाऱ्या पर्यटकांच्या, माथेरानवासीयांनाच्या कायम स्मरणात राहावे यासाठी हे फोटो लावले होते.मात्र मागील काही काळापासून हे फोटो येथून गायब झाले होते.ते फोटो येथील रेल्वे स्थानकात पुन्हा लावण्यात यावे याकरिता आदमजी पीरभॉय यांचे नातू अली अकबर पिरभॉय हे रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत होते. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून हे फोटो पुन्हा माथेरान स्थानकामध्ये लावण्यात आले आहेत.

माथेरानच्या पर्यटना मध्ये मिनीट्रेनचे स्थान अनन्यसाधारण आहे. कारण माथेरानचे पर्यटन आणि या पर्यटन स्थळाचे अस्तित्व खऱ्या अर्थाने मिनीट्रेन सुरू झाल्यानंतरच बहरले होते.या ट्रेनमधून प्रवास करण्याकरिता देश-विदेशातून अनेक पर्यटक दाखल होत असतात.माथेरान मिनीट्रेनचा इतिहास १९०७ मध्ये सुरू झाला. जेव्हा नेरळ आणि माथेरान दरम्यान ही हेरिटेज रेल्वे सुरू झाली.

सर आदमजी पीरभॉय यांनी आपल्या मुलाच्या म्हणजेच अब्दुल हुसैन आदमजी पीरभॉय यांच्या मदतीने १९०४-१९०७ या दरम्यान सोळा लाख रुपयांच्या स्वखर्चाने बांधलेल्या रेल्वेमार्गाचे बांधकाम पूर्ण केले. ही रेल्वे माथेरानला जाण्यासाठी एकमेव रस्ता प्रदान करते ज्यामुळे तिचे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व आहे.मात्र या पिता पुत्रांनी केलेल्या या कामाला हवा तसा सन्मान अजूनही माथेरानमधून मिळाला नसल्याची खंत यांचे नातू अली अकबर पिरभॉय यांनी व्यक्त केली.

## मजगावच्या मल्हारीश्री दत्त जयंती उत्सव

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील मजगावच्या मल्हारी श्री दत्त देवस्थानचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. त्या निमित्त गुरुवार मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेला पहाटेपासूनच विविध कार्यक्रमांबरोबरच मंदिरानजिक मोठी यात्रा भरविण्यात आली आहे.

दत्त जयंती उत्सवाला मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी शुक्रवार दि.२८ नोव्हेंबरपासून प्रारंभ झाला असून सर्व प्रथम सकाळी वीणा पूजन श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायण,दत्तस्तुती भजन, हरिपाठ व रात्री वैभव महाराज खांडेकर यांचे श्रीहरी कीर्तन झाले.त्यानंतर प्रतीदिन आदींची कीर्तने पार पडली.उत्सवाची सांगता शुक्रवारी महाप्रसाद व पालखी सोहळा झाल्या नंतर होणार आहे.

## रसायनीत दत्त जयंती उत्साहात साजरी

**मोहोपाडा :** रसायनी परिसरातील मोहोपाडा,नविन पोसरी,आळी आंबिवली,रसायनी पोलिस स्टेशन तसेच आसपासच्या परिसरात दत्त जयंती अत्यंत भक्तिमय वातावरणात श्री दत्ताची विशेष पूजा व सत्यनारायणाची महापूजा आयोजित करून करण्यात आली. सकाळपासून भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होती. मंदिर फुलांनी रांगोळ्यानी सजवण्यात आले होते. महापूजेनंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळच्या दर्शनानंतर प्रसाद वितरणाचे उत्तम नियोजन दिसून आले.


### जाहीर नोटीस

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, पनवेल हे धर्मादाय आयुक्तांचे अंतर्गत सामाजिक हेतूने विविध साहित्यिक उपक्रम चालवणारे वाचनालय आहे. महानगरपालिकेने वाचनालयाची इमारत धोकादायक असल्याचे कळविले आहे त्यानुसार या संस्थेच्या जीर्ण व धोकादायक झालेल्या इमारतीचे बांधकाम पाडण्यासाठी आवेदन पत्रक मागविण्यात येत आहेत.

तरी स्वारस्य असलेल्या ठेकेदारांनी आपले आवेदन पत्र खालील पत्यावर सादर करावे यासाठी हे प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आलेली आवेदन पत्रे विचारात घेण्यात येतील. तसेच याबाबत आवेदन पत्र स्विकारणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा राहील याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी ग्रंथालयाशी संपर्क साधावा.

**दिनांक : ०६/१२/२०२५**

**सही/-**
**उपाध्यक्ष**
**के. गो. लिमये सार्व. वाचनालय व ग्रंथालय पनवेल**
**फायनल प्लॉट न. २४४ हुतात्मा हिरवे गुरूजी पथ**
**तालुका - पनवेल जिल्हा- रायगड.**
**मोबाईल नं. ९१३७८७७९८२**

### पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**अग्निशमन विभाग**
**दरपत्रके मागविण्यास सुचना**

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता निविदापत्रकांत नमूद केलेनुसार, पनवेल महानगरपालिकेच्या नविन पनवेल अग्निशमन केंद्रातील अग्निशमन वाहन क्र. MH ४६ G ००५४ आणि MH ४६ G ००५७ या वाहनांचे विमा नुतनीकरण करणेबाबत करणे करीता पात्र व इच्छुक संस्था / नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडुन सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती www.panvelcorporation.com या दिनांक ०६/१२/२०२५ रोजी पासुन संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.६६४/६८७/२०२५**
**दिनांक :- ०५/१२/२०२५**

**सही/-**
**(कैलास गावडे)**
**उपआयुक्त (मुख्यालय-I)**
**पनवेल महानगरपालिका**




**नागोठणे : रामनगर येथे श्री साई मित्र मंडळ तर्फ साईबाबा उत्सव व पालखी सोहळा उत्सहात संपन्न.**


### पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर सुचना**
**समाज विकास विभाग**

पनवेल महानगरपालिके मार्फत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणा-या महिलांचे सक्षमीकरण व जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीकोनातून त्यांना स्वयंरोजगार गटासाठी खाली नमुद केलेल्या बाबीकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | वस्तूची नावे | नग | प्रति नग दर GST व करांसाहित | एकूण नग दर GST व करांसाहित |
|---|---|---|---|---|
| १ | घरघंटी (१ HP) | १५०० नग | | |
| २ | शिवणयंत्र | २२०० नग | | |
| ३ | मिरची कांडप | १२०० नग | | |

सदरची दरपत्रके दिनांक १२/१२/२०२५ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या समाज विकास विभागात येथे सादर करावी. विभागाचा पत्ता उर्दू शाळा क्रमांक १०, तळ मजला, पनवेल

**जा.क्र.:-प.म.पा/सकवि/२०/२०२५**
**दिनांक :- ०५/१२/२०२५**

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-II)**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक यांचे मालकीची हक्काची मिळकत असून सदर जमीन मिळकत बाबत विद्यमान मालक **हरेश आर दुहलानी** यांनी आमचे अशिलाना पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असून सदर मिळकतीची विक्री करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार त्यांना असल्याची खात्री व भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे त्या अनुषंगाने विद्यमान मालकांचे आमचे अशिलांशी व्यवहाराची बोलणी सुरू असुन सदर मिळकतीबाबत टायटल निर्वेध असलेबाबत व कोणाचाही कसल्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, करारमदार, कोर्टवाद, गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, पोटगी, चोळी, बांगडी, वगैरे असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर समक्ष येऊन अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. येणे प्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही तक्रार आली नाही तर सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे व कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल. त्या नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका सुधागड, मे. दुय्यम निबंधक सुधागड यांचे अधिकार क्षेत्रातील, तसेच पंचायत समिती सुधागड यांचे कक्षेतील गाव महागाव चे हद्दीतील **गाव मौजे महागाव ता सुधागड जि रायगड येथिल जमीन मिळकतीच वर्णन खालीलप्रमाणे**

| अ.क | मिळकत नं/ गट नं | क्षेत्र हेक्टर आर | एकुण क्षेत्र | आकार रू.- पैसे |
|---|---|---|---|---|
| १. | ४६६/१ | क्षेत्र ०० हे. ४० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे. १२ आर | ०० हे. ५२ | ०० रू.०७ पैसे |
| २. | ४७२ | क्षेत्र ०० हे. २६.९० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे. ०४.४० आर | ०० हे. ३१.३० | ०२ रू. २९ पैसे |
| ३. | ४७६ | क्षेत्र ०० हे. ४० आर | ०० हे. ४० | ०४ रू. ९७ पैसे |
| ४. | ४७७ | क्षेत्र ०० हे. ४६.१० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे. ०७.५० आर | ०० हे. ५३.६० | ०३ रू. ९७ पैसे |
| ५. | ५६२/१ | क्षेत्र ०० हे. ३४.२० आर अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे. ०६.८० आर | ०० हे. ४१ | ०३ रू. ०९ पैसे |

**लोणावळा**
**दिनांक : ०५/१२/२०२५**

**सही/-**
**राजू शांताराम शिंदे**
**ॲडव्होकेट**
**२६ व २७, यशवंतराव चव्हाण संकुल स्टेट बँक ऑफ इंडिया समोर, लोणावळा ता मावळ जि पुणे ४१० ४०१.**
**मो नं ९३७०७१२१२१, advraju11@gmail.com**

### महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**
**निविदा सूचना क्रमांक ४४ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनीक्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणी कृतकंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोलादपुर तहसिल कार्यालयाची दुरुस्ती व नविन सेतु कार्यालयाचे बांधकाम करणे ता पोलादपुर | ३६६८८९०/- | ३७०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ |
| २ | मौजे वडघर ता. पोलादपूर, जि. रायगड येथे सामाजिक सभागृह बांधणे. | १६९७६८३- | १७०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ |
| ३ | विळे पाटणूस रस्ता रा.मा. ९८ कि.मी. ७६/८०० ते८१/८०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ११३७९९०/- | १२०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा |
| ४ | म्हासांडी कोरखंडे किस्तकेतकी निगुडशेत व रा.मा. ९७ ते मेढे रा.मा. ९१ प्राजिमा ८१ कि.मी. २/१०० ते २/१५० मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. | १२७१४१७/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ५ | म्हासांडी कोरखंडे किस्तकेतकी निगुडशेत व रा.मा. ९७ ते मेढे रा.मा. ९१ प्राजिमा ८१ कि.मी. २/२०० ते २/२५० मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. | ११८७८७६/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ६ | औद्योगिक प्राशिक्षण संस्था नागोठणे येथील प्राचार्य कक्ष व कार्यालयीन कक्षाची किरकोळ दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | १२६८७५०/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ७ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणे येथील कार्यशाळेची (छप्पर) दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | १०८२५७१/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०५/१२/२०२५** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१२/१२/२०२५** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन द्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात **दि. १५/१२/२०२५** वेळ १०.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४५५०**
**दिनांक : ०४/१२/२०२५**

**आरओसी/२०२५-२६/क्र.५/सी ४३९७**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# करंजा-रेवस रो-रोसाठी नव्याने निविदा प्रक्रिया

**उरण : प्रतिनिधी**

कंत्राटदार काम अर्धवट सोडून गेल्याने ३४ कोटी खर्चाच्या करंजा-रेवस सागरी मार्गावरील रो-रो जेट्टीचे काम मागील काही महिन्यांपासून रखडले आहे. त्यामुळे रो-रोचे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी खर्चात वाढ झाली आहे. त्यामुळे आता पुन्हा नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती मुंबई सागरी महामंडळाचे कार्यकारी अभियंता मनिष मेतकर यांनी दिली आहे.



कोकणशी जोडणाऱ्या करंजा-रेवस सागरी मार्गावरील पर्यटक व प्रवाशांना कमी वेळेत प्रवास करण्यासाठी रेवस-करंजा रो-रो प्रकल्पाचे काम सागरमाला योजनेतून सुरू करण्यात आले होते. ३४ कोटी खर्चाच्या रेवस-करंजा रो-रो प्रकल्पाच्या कामावर मोठ्या प्रमाणावर खर्चही करण्यात आला आहे, मात्र अद्यापही या सागरी मार्गावरील काम अपूर्ण अवस्थेत असल्याने रो-रो सेवा सुरू झालेली नाही.

करंजा बंदरातील रो-रो जेटीचे काम पूर्ण झाले आहे, मात्र रेवस येथील

## वर्षभरातच काम पूर्ण होणार

रो-रो जेट्टीचे काम मागील काही महिन्यांपासून रखडले आहे. काही प्रमाणात बांधकाम, ब्रेकवॉटर जेट्टी, ड्रेझिंग, वाहनतळ व जोडरस्त्यांची कामे करण्यात आली आहेत.

समुद्रातील पायलिंगची बहुतांश कामेही अद्याप अपुऱ्या अवस्थेत आहेत, मात्र ठेकेदार जेट्टीचे काम अर्धवट अवस्थेत सोडून गेल्याने करंजा-रेवस रो-रो सेवेचे काम रखडले आहे. ठेकेदार काम अर्धवट सोडून गेल्याने त्याला टर्मिनेट करण्यात आले आहे.त्यामुळेच करंजा-रेवस रो-रो सेवेचे काम रखडले आहे. रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी आचारसंहिता संपुष्टात येताच आता नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या विलंबामुळे कामाच्या खर्चातही वाढ होणार आहे.निविदा प्रक्रीयेनंतर वर्षभराच्या कालावधीत रखडलेल्या करंजा-रेवस रो-रो सेवेचे काम पूर्ण होईल, अशी माहिती मुंबई सागरी महामंडळाचे कार्यकारी अभियंता मनिष मेतकर यांनी दिली आहे.

# गहाळ मोबाईल मुळ मालकांना सुपूर्द

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखा, कक्ष २ यांनी गहाळ झालेले ८,९२,५७४ रुपये किमतीचे ५३ मोबाईल फोन मुळ मालकांना परत केले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत असणाऱ्या पोलीस ठाणेकडे विविध इसमांकडून मोबाईल गहाळ झालेबाबतच्या तक्रारी नोंद करण्यात येतात. गहाळ मोबाईल CEIR या शासकीय पोर्टलचे सहाय्याने व तांत्रिक तपास करुन गहाळ मोबाईलमध्ये नवीन मोबाईल नंबर निष्पन्न झाल्यानंतर महाराष्ट्र तसेच विविध राज्यातील इसमांना सदर मोबाईल नंबरवर संपर्क करून मोबाईल धारकास मोबाईलचे



वस्तुस्थितीबाबतची माहिती देवुन त्यांचेकडुन सदरचे मोबाईल फोन प्राप्त केले जातात. त्यानुसार सप्टेंबर २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गहाळ झालेले ८,९२,५७ रुपये किंमतीचे ५३ मोबाईल फोन कक्ष २, गुन्हे शाखेकडून प्राप्त केले.

५३ मोबाईल फोन मुळ मालकांना परत देण्यात आले आहेत. गहाळ झालेले मोबाईल फोन परत मिळाल्याने मोबाईल मालकांनी त्याबाबत आनंद व्यक्त केला.

# रामशेठ ठाकूर विद्यालयातर्फे आर्थिक साक्षरतेवर मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अकाउंटिंग व फायनान्स विभागातर्फे गुरुवारी (दि.४) रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय, ओवेपेठ. येथे एक शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आला.



या सत्रामध्ये ५७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला तसेच विद्यार्थ्यांसाठी 'आर्थिक साक्षरता' या विषयावर विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले त्यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांना बचत करण्याचे महत्त्व, बजेट कसे बनवावे, खर्चावर नियंत्रण कसे ठेवावे तसेच दैनंदिन आर्थिक व्यवहारांमध्ये सुज्ञ निर्णय कसे घ्यावेत याबाबत प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित उदाहरणांसह समजावून सांगण्यात आले तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्यातील आर्थिक शिस्तीची पायाभरणी करण्यासाठी या सत्राने एक महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. हे मार्गदर्शन सत्र प्रा. श्वेतांबरी बोठे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून प्रत्येक आर्थिक संकल्पनेचे सोप्या भाषेत आणि आकर्षक पद्धतीने विश्लेषण केले व त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे सत्र अधिक माहितीपूर्ण आणि संवादात्मक बनले.

या उपक्रमासाठी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संतोष खांदेकर-मुख्याध्यापक, रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय खारघर-ओवेपेठ यांचे विशेष आभार मानण्यात आले. तसेच अकाउंटिंग आणि फायनान्स विभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रवर शर्मा, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष समन्वयक, प्रा. प्रथमेश उदेकर, तसेच महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, यांनी दिलेले सततचे मार्गदर्शन, प्रेरणा व सहकार्य यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे राबविणे शक्य झाले. अशा विद्यार्थीकेंद्रित आणि समाजाभिमुख उपक्रमांना नेहमी प्रेरणा, प्रोत्साहन आणि पाठिंबा देणाऱ्या व्यवस्थापनाचे अकाउंटिंग आणि फायनान्स विभागातर्फे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक जाणीव वाढविण्यासाठी आणि त्यांचे भविष्यातील आर्थिक आरोग्य सक्षम करण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरणार आहेत. हे सत्र अधिक उत्तम व परिणामकारक होण्यासाठी प्रा. योगिता पाटील, प्रा. आनंद शेलार आणि प्रा. करिश्मा पाटील व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सक्रिय सहकार्य दिले.

# उरणमध्ये स्ट्राँग रूमला पोलिसांचा बंदोबस्त

**उरण : बातमीदार**

उरण नगर परिषदेचे सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर २०२५ रोजी झाली. निकाल ३ डिसेंबर २०२५ लागणार होते, मात्र उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार उरण नगरपरिषदेच्या निकाल २१ डिसेंबर २०२५ लागणार आहे. न्यायालयाने मतपेटी या कडक बंदोबस्त मध्ये ठेवण्यात यावेत, असे आदेश दिल्याने उरण नगरपरिषदेत स्ट्राँग रूम तयार करण्यात आले असून या स्ट्राँग रूममध्ये मतपेटी सुरक्षित ठेवण्यात आलेले आहेत.

स्ट्राँग रूमसाठी २४ तास कडक पोलीस बंदोबस्त असून एक ए पी आय व १२ अंमलदार दिवसासाठी कार्यरत आहेत तर रात्री एक अधिकारी वीस पोलीस कर्मचारी कार्यरत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश देवरे यांनी दिली आहे.

उरण नगर परिषदेच्या स्ट्राँग रूममध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यरत असून एकूण आठ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.




कॅमेऱ्याच्या माध्यमातून स्ट्राँग रूम वर, मतपेटीवर लक्ष ठेवले जात आहे. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी कधीही येऊन जाऊ शकतात. बघून जाऊ शकतात त्यांचे रजिस्टर वेगळे ठेवले आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार उद्धव कदम यांनी दिली आहे. स्ट्राँग रूमसाठी उरण पोलिसांचा कडक बंदोबस्त असून महाराष्ट्र शासनातर्फे योग्य ती खबरदारीचे उपायोजना स्ट्राँग रूमसाठी करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व नियमांचे पालन करून स्ट्राँग रूम व मतपेटी सुरक्षित ठेवण्यात आले आहेत.

# टेंभोडेतील रस्त्याचे रुंदीकरण आणि मजबुतीकरण होणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील टेंभोडे येथील अत्यंत आवश्यक असलेल्या ५०० मीटर लांबीच्या रस्त्याचे रुंदीकरण आणि मजबुतीकरण लवकरच पूर्ण होणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सुमारे दोन कोटी ९९ लाख रुपयांच्या निधीतून हे काम करण्यात येणार असून, याचे भूमिपूजन भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि.३) करण्यात आले.




पनवेल विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना उत्कृष्ट पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी आमदार प्रशांत ठाकूर नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांच्या निधीतून टेंभोडे येथील स्मशानभूमीपासून पुढील ५०० मीटरपर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण आणि मजबुतीकरण केले जाणार आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना सध्या रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुका सरचिटणीस प्रतिभा भोईर यांनी या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला, ज्यामुळे हे काम मार्गी लागले आहे. रस्त्याचे काँक्रिटीकरण झाल्यानंतर स्थानिकांना आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

याकामाच्या भुमीपूजनावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, पनवेल तालुका महिला मोर्चा सरचिटणीस प्रतिभा भोईर, टेंभोडेचे माजी सरपंच के. के. कडव, माजी उपसरपंच ललीता भोईर, दिलीप वास्कर, सुभाष भोईर, संतोष भोईर, सुरेश भोईर, निलेश भोईर, मारुती चिखलेकर, सचीन चौधरी, अंकुश पाटील, राजेश काथारा, आकाश काथारा, यश भोईर, डी.एम. पाटील, मोहन गडगे, केसरीनाथ भोईर, मधुकर बोलके, लक्ष्मण गडगे, दिनेश गडगे, अर्जुन भोईर, गणेश पाटील, सुरज गायकवाड, सनील गायकवाड, आदित्य भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



# दिव्यांग सामाजिक संस्था उरणतर्फे दिव्यांग दिन

**उरण : बातमीदार**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जेएनपीए बहुउद्देशीय सभागृह येथे उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवां करता दिव्यांग सामाजिक संस्था उरण यांच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन सोहळा साजरा करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून मनीषा जाधव (महाव्यवस्थापिका प्रशासन व सचिव), रवींद्र पाटील (जेएनपीए विश्वस्त), सयाजी साळुंखे (जेएनपीए मॅनेजर इस्टेट), अरविंद घरत, संदीप घरत (जेएनपीए प्रतिनिधी), वर्षा म्हात्रे (दिव्यांग प्रशासन अलिबाग), सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, सामाजिक कार्यकर्ते विशाल पाटेकर, वकील धीरज डाकी, पत्रकार विठ्ठल ममताबादे, पत्रकार उत्कर्ष समितीचे उरण तालुका अध्यक्ष पूजा चव्हाण, तृप्ती भोईर, सायली साळुंके आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील वर्तक यांनी तर आभार प्रदर्शन महेंद्र म्हात्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिव्यांग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्र म्हात्रे, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार समीर ठाकूर, सचिव उमेश पाटील, महेश पाटील, योगेश पाटील, संदेश राजगुरू, रणिता ठाकूर, दिव्यांग सामाजिक संस्थेचे सल्लागार मदन पाटील यांच्यासह सर्वच पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली आहे.

# चोरीच्या घटना रोखण्यासाठी उपाय करा; भाजप पदाधिकाऱ्यांची पोलिसांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील श्री विरुपाक्ष महादेव मंदिर परिसरात गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या टाळेफोड प्रकरणांमुळे व्यापारी वर्गात तीव्र चिंता निर्माण झाली आहे. परिसरातील विविध कपड्यांच्या दुकानांमध्ये टाळे फोडून चोरीचा प्रयत्न होत असल्याची अनेक प्रकरणे समोर आल्यानंतर व्यापाऱ्यांनी अखेर पोलिसांकडे धाव घेतली. संबंधित प्रकरणाची नोंद पनवेल पोलीस



ठाण्यात करण्यात आली आहे.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी त्वरीत प्रतिसाद देत घटनास्थळी भेट देऊन संपूर्ण परिसराची पाहणी केली. वाढत्या चोरीच्या प्रयत्नांवर नियंत्रण आणण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात येत असून, पुढील १५ दिवसांत चोरट्यांना पकडण्याचे आश्वासन त्यांनी व्यापाऱ्यांना दिले. व्यापाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड होऊ नये, तसेच पोलिसांनी गस्त वाढवावी, सीसीटीव्हीची तपासणी नियमितपणे व्हावी आणि चोरीच्या प्रयत्नांना आळा बसावा, यासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते नंदू पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापारी बांधवांनी पोलिसांना पत्राद्वारे विनंती केली. व्यापाऱ्यांची सुरक्षा ही शहराच्या आर्थिक चक्रासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचेही या वेळी नमूद करण्यात आले.

या वेळी भाजपा महिला मोर्चा शहराध्यक्ष रूचिता लोंढे, भाजयुमो पनवेल मंडल सरचिटणीस अनिमेष ओझे, चिटणीस हर्षल बहाडकर तसेच युवा मोर्चा प्रभाग क्रमांक अध्यक्ष अनिमेष पटवर्धन उपस्थित होते.

# डिझेलचोरी करणारे पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात उभ्या असणाऱ्या वाहनातून डिझेल चोरी करणाऱ्या दोघांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून चोरीचे २७० लिटर डिझेल हस्तगत केले आहेत.

पनवेलजवळील साईकृपा हॉटेलच्या पुढे टायर पंचर दुकानाच्या बाजूस २ ट्रेलर उभे असताना आरोपी शाहिद आफ्रिदी नूर मोहम्मद शेख (२४ रा. गोवंडी), मोहम्मद हसनैन दिलशाद शेख (वय २० रा. गोवंडी) व तिसरा सहकारी यांनी २ ट्रेलरमधील जवळपास ५५० लिटर डिझेल चोरून ते पसार झाले होते. याबाबतची तक्रार दिलीप जोखू कुमार यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात देताच पोलिसांच्या पथकाने गुप्त बातमीदार व तुर्भे पोलिसांच्या आधारे दोन आरोपींना तुर्भे परिसरातून ताब्यात घेतले असून त्यांच्या कडून चोरीचे २७० लिटर डिझेल हस्तगत केले आहेत. तर फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

# चाईल्ड केअरतर्फे वृद्धाश्रमात अन्नदान

**उरण : बातमीदार**

चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगडतर्फे करुणेश्वर वांजे वृद्धाश्रमात अन्न दान करण्यात आले.

संस्थेचे कार्याध्यक्ष विक्रांत कडू यांच्या वाढदिवसाच्या निमित्त वृद्धाश्रमात अन्नदान करण्यात आले, दरम्यान, उरण तालुक्यातील सुप्रसिद्ध गायक विवेक केणी यांचा संस्थेतर्फे रायगड विशेष ह्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू यांनी बोलताना सांगितले की करुणेश्वर वृद्धाश्रम म्हणजे एक समाज मंदिर आहे या मंदिरात सर्व वृद्धांची जी नीटनेटकेपणे सेवा केली जाते त्या बद्दल ईश्वर ढेरे व करुणा ढेरे यांचे करावे तितके कौतुक कमी पडेल यांच्या कार्याला चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड



तर्फे मनाचा मुजरा कार्यक्रमाचे निवेदन पेण तालुक्याचे अक्षय पाटील यांनी केले.

संस्थेतर्फे विकास कडू (संस्थापक अध्यक्ष), विक्रांत कडू (कार्याध्यक्ष), विवेक केणी (सदस्य), रोशन धुमाळ(सदस्य), कु. विवेक कडू सदस्य) तसेच करुणेश्वर वृद्धाश्रमचे संचालक ईश्वर ढेरे, उत्कर्ष समिती पेण तालुका अध्यक्ष अक्षय पाटील तसेच वृद्धाश्रमाचे १५ कर्मचारी व ३३ वृद्ध व चार मुले या कार्यक्रमात हजर होते. कार्यक्रमांची प्रस्तावना विकास कडू यांनी तर आभार वृद्धाश्रमाचे ईश्वर ढेरे यांनी केले.

# कळंबोलीत दत्त जयंती उत्सव साजरा

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहती मध्ये दत्त जयंती उत्सव मोठ्या जल्लोषात अन भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. विविध संस्था,हाऊसिंग सोसायटी,मंदिर, स्वामी समर्थ मठ यामधून दत्त जयंती उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात आला. या वेळी हजारो दत्त भक्तांनी या सोहळ्यात सहभाग घेतला.



कळंबोलीतील दत्तकृपा चारिटेबल ट्रस्ट या संस्थेमार्फत १४ वर्षापासून दत्त जयंती उत्सव श्री सिद्धिविनायक ओनर्स अपार्टमेंट मध्ये मोठ्या भक्ती भावाने जल्लोषात साजरी करण्यात येते. दत्त जयंती निमित्त पहाटेपासून या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दत्त जयंती झाल्यानंतर दत्त मूर्ती आणि पादुकांचे कळंबोली वसाहती मधून वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात मिरवणूकही काढण्यात आली. दत्त जयंतीच्या या उत्सवामध्ये माधव गुरुजी ज्ञानेश्वर तीवाटणे महाराजांनी सहभाग घेऊन सर्वांना या या निमित्ताने शुभाशीर्वाद दिले. येथील दत्त जयंती उत्सवाचे नियोजन व आयोजन व त्यातील दिमागदार सोहळा हा ट्रस्टचे अध्यक्ष माधुरी दीपक फणसे यांनी केले होते.

या दत्त जयंती उत्सव सोहळयाला कळंबोलीतील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक सरातील विविध मान्यवरांनी उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घेतला. दत्त जयंती नंतर सायंकाळी महाप्रसादाचे आयोजनही ट्रस्ट कडून करण्यात आले होते. याप्रमाणेच कळंबोलीतील विविध मंदिरातून तसेच श्री स्वामी समर्थ मठातून दत्तजयंती उत्सवही मोठ्या धुमधडाक्यात उत्साह पूर्ण व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी कोणतीही कायदा सुव्यवस्था बिघडू नये याकरता कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी विशेष पोलीस कर्मचारी तैनात केले होते.

# बारावीच्या विद्यार्थ्यांना बाह्य तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांना सर्व विषयांसाठी सालाबादप्रमाणे याही वर्षी बाह्य तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यानमालेस बुधवारी (दि.३) प्रारंभ झाला.



या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प बारावी कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी भूगोल व अकांटन्सी या विषयांसाठी फुंडे महाविद्यालयातील ज्युनिअर कॉलेज शिक्षक अनुक्रमे बाबुलाल पाटोळे व राजू खेडकर यांनी गुंफले. प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही व्याख्यानमाला आयोजित केली असल्याचे ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले यांनी सांगितले.

व्याख्यानमालेच्या प्रारंभ समयी झालेल्या स्वागत समारंभास विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले, सर्व ज्युनिअर कॉलेज शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. संजय उगले यांनी स्वागत समारंभाचे प्रास्ताविक केले तर माणिक घरत यांनी आभार मानले.

# कशेणे गावातील रहिवाश्यांची घरे होणार अधिकृत; भाजपाचे निलेश थोरे यांचा पुढाकार

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तळाशेत मधील कशेणे गावातील अनेक रहिवाश्यांची घरे ही वर्षानुवर्षे गुरुचरण मध्ये असल्याने शासकीय कार्यालयीन कामगाजामध्ये त्यांना अनेक अडचणी येत होत्या,गेली अनेक वर्षे संबंधित नागरिक हे आपल्याच मालकीची घरे असूनही दडपणाखाली होते परंतु महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये भाजपा महायुती सरकार आल्यानंतर भाजपाचे नेते व राज्याचे महसूलमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी सर्वांसाठी घरे हा उपक्रम चालू करून ज्या नागरिकांची ३१ डिसेंबर २०११ पूर्वीची शासकीय जमिनीमध्ये निवासी घरे आहेत अशांना मोठा दिलासा देऊन ती घरे नियमानुकूल करून देण्याचा शासकीय अध्यादेश काढला आहे.



याच धर्तीवर माणगाव तालुक्यातील तळाशेत जिल्हा परिषद मतदारसंघातील कशेणे गावच्या अनेक ग्रामस्थांची घरे ही सरकारी गुरचरण मध्ये असल्याने ती नियमित करण्यासाठी भाजपाचे युवक जिल्हाध्यक्ष व महायुतीचे युवानेते निलेश थोरे यांनी देवेंद्र मुंढे यांच्यासमवेत पुढाकार घेतला असून आज त्यांनी सर्व लाभार्थी ग्रामस्थांसमवेत उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप,नायब तहसीलदार विपुलजी ढुमे,माणगाव पंचायत समितीच्या बी.डी.ओ.शुभदा पाटील कुलकर्णी,अतिरिक्त बी.डी. ओ.जाधव,भूमीअभिलेख कार्यालयाचे अधिकारी संजय जावरे,तळाशेत ग्रामपंचायत प्रशासक गोल्हार साहेब या सर्व अधिकाऱ्यांची भेट घेऊन सदरील ग्रामस्थांची घरे ही शासकीय अध्यादेशानुसार नियमित करून द्यावी ही मागणी केली आहे.यावेळी प्रांतधिकारी डॉ.संदीपान सानप यांनी उपस्थितांकडून पूर्ण माहिती घेऊन तात्काळ बिडीओंना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

यामुळे सर्व घरधारकांना मोठा दिलासा मिळणार असून युवानेते निलेश थोरे यांच्या भूमिकेमुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला प्रश्न सुटणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे देवेंद्र मुंढे यांनी सांगितले आहे. दरम्यान सदरील प्रकरणामध्ये आपण शेवटपर्यंत पाठपुरावा करणार असून महसूलमंत्री ना.चंद्रशेखरजी बावनकुळे साहेबांनी घेतलेल्या लोककल्याणकारी निर्णयाचा फायदा व महायुती सरकारच्या सर्वच योजनांचा लाभ हा समाजातील तळागाळातील सर्व घटकांना मिळवून देण्यासाठी आम्ही कटीबद्ध असल्याचे सांगितले. सदर प्रकरणी गरज भासल्यास ना.चंद्रशेखर बावनकुळे साहेबांची भेट घेऊन ग्रामस्थांना सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

## नेरळ विद्या मंदिर माजी विद्यार्थी संघाकडून संगणक भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रमात माजी विद्यार्थी संघाच्या वतीने शाळेच्या कार्यालयीन कामासाठी संगणक भेट देण्यात आला.

नेरळ येथे असलेल्या विद्या मंदिर मंडळाच्या वार्षिक स्नेह संमेलन यांचे आयोजन नेरळ ममदापूर येथील शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले होते. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेह संमेलन सुद्धा आयोजित करण्यात आले होते.

या सोहळ्यात संस्थेचे संयुक्त सचिव विवेक पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित स्नेह संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून लीला एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष मंजुनाथ आचार्य उपस्थित होते.

या कार्यक्रमात नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी संघ सहभागी झाला होता. माजी विद्यार्थी संघाच्या वतीने अध्यक्ष संजय गवळी, उपाध्यक्ष राजू झुगरे, सचिव शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद विचवे, कोषाध्यक्ष महेश खारीक, आत्माराम घोडविंडे, राजेश शिंदे, सुभाष नाईक, रामदास शेळके, गौतम अडंगळे, शंकर मोरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघाच्या वतीने नेरळ विद्या मंदिर शाळेच्या कार्यालयीन कामासाठी एक संगणक भेट देण्यात आला.



## गंगुबाई भगत यांना आदिवासी गिरीजन राज्यस्तरीय युवा पुरस्कार

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आनंदवाडी (मोग्रज) या आदिवासी बहुल भागातील गंगुबाई चांगो भगत यांनी आपल्या सुरेल आवाजातून आणि पारंपरिक आदिवासी लोककलेच्या जतनातून राज्य व देशाच्या सांस्कृतिक क्षेत्रात नोंद घेण्यासारखे योगदान दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा आदिवासी गिरीजन राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा पुरस्कार २०२५ प्राप्त केला.

हा मानाचा पुरस्कार दादर प्रभादेवी, मुंबई येथील रवींद्र नाट्य मंदिरात ३ डिसेंबर रोजी आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्य



पुरस्कार सोहळा पार पडला.

गंगुबाई भगत या गेली अनेक दशके आदिवासी समाजातील पारंपरिक गाणी, ठेका, ताल, धृवपद आणि ऋतुचक्रानुसार गायल्या जाणाऱ्या लोकगीतांचा वारसा जपण्याचे कार्य करत आहेत. त्यांच्या आवाजातील चालबद्ध लय, तालांची नैसर्गिक सुसंगती व जमातीच्या अस्सल परंपरेचे जिवंत दर्शन आजही जनमानसात रोमांच निर्माण करते.गंगूबाई यांच्या ओठातून आलेले शब्द कवितेच्या ओळी स्वरूपात कुटुंबाने जतन केल्या असून तो एक महत्त्वाचा साहित्यिक वारसा ठरत असून पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरत आहे. आदिवासी जीवनशैलीचे सूर प्रतिबिंबित करणारी पोवार, गोंडी, हलकी–फुलकी पाड्याची गाणी, शेतकरी गीत, पावसाळी सणांची गाणी आणि उत्सव–नृत्यावरील परंपरागत गीत गंगुबाई भगत यांच्यामुळे आजही मूळ चवीत जतन होत आहेत. आधुनिकतेच्या लाटेत हरवत चाललेल्या लोकसंस्कृतीला आपल्या आवाजातून आणि सादरीकरणातून त्यांनी पुनरुज्जीवन दिले म्हणूनच या गौरवासाठी त्यांची निवड झाली.

## हरवंडीतील नुकसानग्रस्त मानकर कुटुंबीयांना ॲड. साबळेंकडून मदत

**माणगाव : प्रतिनिधी**

हरवंडी – निजामपूर परिसरात सोमवारी उशिरा रात्री अचानक उसळलेल्या आगीने परशूराम मानकर यांचे संसाराचे स्वप्न क्षणात राख केले. शॉर्टसर्किटचा ठिणगीच्या रूपात आलेला आपत्तीचा हा महाकाय स्पार्क काही मिनिटांत घराला भस्मसात करून गेला. जीवन जगायला लागणाऱ्या वस्तू–भांडी, कपडे, धान्य, पिकलेल्या आशा, उद्याचा आधार सगळं क्षणात जळून खाक झालं.

मानकर कुटुंब बाहेर उभं डोळ्यांसमोरचा जळता संसार




पाहत नि:शब्दआणि रात्रीच्या काळोखात त्यांच्या डोळ्यांत मात्र चौफेर अंधार होता. क्षणात उध्वस्त झालेला संसार होता. आगीचा मोठा भडका अचानक उठला. परशूराम मानकर आणि त्यांचे कुटुंब जीव वाचवून घराबाहेर पळाले. आरडाओरड करत गावकऱ्यांना हाक मारली. ग्रामस्थांनी धावपळ करत पाणी फेकलं, माती टाकली पण तोपर्यंत सर्व काही जळून खाक झाले होते. घराच्या जागी उरले होते फक्त राख धुराचे वलय आणि उघड्या आकाशाखाली आसुसलेलं कुटुंब. आता जगायचं कसं? खायचं काय? हा यक्षप्रश्न मानकर कुटुंबाला अक्षरशः कोसळवून गेला.

ॲड. राजीव साबळे जणू देवदूतासारखे घटनास्थळी पोहोचले. दुःखाने गलबललेल्या मानकर कुटुंबाकडे त्यांनी तत्काळ मदतीचा मोठा हात पुढे केला. ५१,००० रुपये रोख,१०० किलो तांदूळ, २० किलो डाळी, १० किलो तेल जीवनावश्यक वस्तू ही मदत ते देताना त्यांच्या आवाजात फक्त एकच भावना होती. तुम्ही एकटे नाही. आम्ही आहोत.

## चौल श्री दत्तयात्रेतून हरवलाय तमाशाच्या ढोलकीचा नाद

**रेवदंडा: प्रतिनिधी**

गावागावातील प्रसिध्द जत्रा–यात्रा महाराष्ट्रासह रायगड जिल्हात सुध्दा आजही प्रसिध्दीस आहेत. या जत्रेंच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ठेवा तमाशा व लावणीची खरा अर्थान जपवणूक झाली आहे. असंख्य रसिक प्रेक्षक या जत्रेच्या माध्यमातून लोककलेचा आनंद लुटूत असतात. कोणी एकेकाळी तमाशा व लावणीचा फड चौल दत्तयात्रेच्या निमित्ताने रसिक प्रेक्षकांची खरी आवड होती. जत्रा म्हटली की, ढोलकीचा ताल, ढोलकीचा ठेका, लावणीचा ताल अस्सल मराठी ढोलकी व लावणीचा तोडा...मात्र चौलच्या श्री दत्त यात्रेतील तमाशा व लावणीचा फडाचा नाद हरवला असून तमाशा व लावणीच्या फडाच्या गैरहजेरीने प्रेमी रसिक प्रेक्षकांची खुप नाराजी आहे.




चौल भोवाळे पर्वतवासी श्री दत्त यात्रा संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिध्दीस आहे, प्रतिवर्षी पाच दिवस दत्त जयंती निमित्त या भव्य यात्रेचे नियोजन पारंपारिक पध्दतीने होत असते. सर्वात मोठी व आर्थिक उलाढालीची यात्रा म्हणून चौल श्री दत्त यात्रेची ओळख आहे. कोरोना कालावधी सोडला तर प्रतिवर्षी चौल श्री दत्तयात्रेस रायगडसह महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून चौल श्री दत्त यात्रा भाविक,पर्यटक व यात्रेकरू यांच्या प्रचंड गर्दीने भरते. महाराष्ट्रातील यात्राची परंपरेची जपवणूक चौल श्री दत्त यात्रेंने खरा अर्थाने ठेवली गेली आहे.

चौल भोवाळे येथे पर्वतवासी श्री दत्त जयंती उत्सवाचे निमित्ताने पारंपारीक पध्दतीने श्री दत्त यात्रा भरते, या यात्रेस परिसरातील शेतकरी बंधू निश्चित येतात. चौल यात्रेच्या निमित्ताने विविध वस्तूचे स्टॉल, मिठाई, आकाश पाळणे, आदी अनेक दुकाने थाटलेली असतात. परंतू चौल श्री दत्त यात्रेत मुख्य आकर्षण होते ते तमाशा व लावणीचा फड, काही वर्षापुर्वी तमाशा व लावणी प्रेमी रसिक प्रेक्षकांच्या मागणी व आवडीने येथे तमाश्याचे दोन फड येत असत. सांस्कृतिक कार्यक्रमाचे निमित्ताने या तमाशा फडाला मोठी गर्दी रसिक प्रेक्षकांची होत असे. तमाश्याच्या ढोलकीच्या ठेकावर व लावणीच्या तालावर येथील रसिक प्रेक्षक ठेका धरत असत. महाराष्ट्रातील अनेक प्रसिध्द तमाशा फडानी चौल श्री दत्त यात्रेच्या निमित्ताने तमाशा व लावणी कलावंतानी लोककलेची अदाकारी येथे रसिक प्रेक्षकांना सादर केली आहे.

मात्र चौल यात्रेत प्रतिवर्षी येत असलेला तमाश्याचा फडाची उपस्थिती गेले काही वर्ष होत नाही. अनेकदा रसिक प्रेक्षकांनी चौल श्री दत्त यात्रेस तमाश्याचा फड पुनस्यः सुरू व्हावा म्हणून मागणी केली, प्रयत्न केले. परंतू काहीच्या गैर मागण्याने तमाश्या फडानी चौल श्री दत्त यात्रेस तोंड फिरविल्याचा आरोप स्थानिकस्तरावर केला जातोय. व त्यामुळे आर्थिक उत्पन्नात होत असलेली घट, काहीच्या नाहक त्रासाने व सुरक्षीत भावना नसल्याने येथे तमाशा फड मंडळी येथ नसल्याचे म्हटले जातेय.

## रोहा प्रेस क्लबच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील दानशूर व्यक्तिमत्त्व, प्रेस फोटोग्राफर कै. जनार्दन शेडगे यांच्या स्मरणार्थ रोहा प्रेस क्लब व कै जनार्दन शेडगे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ११५ पिशव्या रक्त जमा करण्यात आले. कै जनार्दन शेडगे यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक वेळा रक्तदान करून रूग्णांचे प्राण वाचवले होते. ती भावना कायम ठेवण्याच्या उद्देशाने रोहा प्रेस क्लबच्या वतीने गेली २३ वर्षे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे.

शिबिराच्या प्रारंभी कै जनार्दन शेडगे यांना मंडळाचे अध्यक्ष अरूण करंबे, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष सुहास खरिवले यांच्यासह उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली. या शिबिरास मंत्री अदिती तटकरे, विजयराव मोरे, विनोद पाशीलकर, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, सामाजिक कार्यकर्ते आप्पा देशमुख,रोशन चाफेकर, वनश्री शेडगे आदिं मान्यवरांसह औद्योगिक वसाहतीतील विविध कारखान्यांचे व्यवस्थापक, रोह्यातली प्रतिष्ठित



नागरिक, व समाजसेवी संस्थानी भेट दिली.

या शिबिरासाठी जिल्हा प्रेस क्लबचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, रोहा प्रेस क्लब अध्यक्ष सुहास खरीवले, परिषद प्रतिनिधी शशिकांत आदींसह प्रेस क्लब व शेडगे मित्रमंडळाने परिश्रम घेतले.

## माणगाव उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या रिया उभारे बिनविरोध

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील राजकीयदृष्ट्या महत्वपूर्णअशा ओळखल्या जाणाऱ्या माणगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रिया रत्नाकर उभारे यांची गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणुकीचे पीठासन अधिकारी तथा माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप यांनी नगरसेवक,नगरसेविका यांची विशेष सभा बोलावून केली. या निवडीवेळी प्रांताधिकारी यांच्यासमवेत मदतीस म्हणून नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी उपस्थित होते. रिया उभारे यांची माणगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

माणगाव नगरपंचायतीच्या माजी उपनगराध्यक्षा हर्षदा



सोंडकर – काळे यांनी आपला उपनगराध्यक्ष पदाचा ठरल्याप्रमाणे कार्यकाळ पूर्ण झाल्यावर राजीनामा दिला होता. या रिक्त झालेल्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम रायगड जिल्हाधीकारी किशन जावळे यांनी जाहीर केला होता. त्यानुसार या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे रिया रत्नाकर उभारे यांचा नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याच्या दिवशी सोमवार दि.१ डिसेंबर रोजी एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला होता.

माणगाव नगरीच्या उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रिया उभारे यांचे खा.सुनील तटकरे,राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे,माजी आ.अनिकेत तटकरे,राष्ट्रवादी काँग्रेसचे कोकण विभाग प्रवक्ते अँड.राजीव साबळे,जिल्हा राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे,माजी नगराध्यक्ष आनंद यादव,योगिता चव्हाण,प्रदेश राष्ट्रवादीचे युवक सचिव दिपक जाधव,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काका नवगणे,यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आपल्या निवडीबद्दल प्रसार माध्यमांजवळ बोलताना नवनिर्वाचित माणगाव नगरीच्या उपनगराध्यक्षा रिया उभारे यांनी सांगितले कि,सुरुवातीलाच मी आमचे नेते खा.सुनील तटकरे साहेब,मंत्री आदितीताई तटकरे,माजी आमदार अनिकेतभाई तटकरे यांचे मनापासून आभार व ऋण व्यक्त करीत त्यांनी मला उपनगराध्यक्ष पदाची संधी दिली असे सांगत या संधीचे मी सोने करीन. मी माणगाव नगरीच्या विकासासाठी मला जो काही उपनगराध्यक्ष पदाचा कालावधी मिळाला आहे

## पत्रकारांच्या कुटुंबियांची मोफत आरोग्य तपासणी

**धाटाव: प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेच्या ८७ व्या वर्धापन दिनानिमित्त दि.३ डिसें. रोजी राज्यातील जिल्हा आणि तालुकास्तरावर पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. रोहयातील पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांनी या आवाहनाला प्रतिसाद देत येथिल नामांकित डॉ. अशोक जाधव यांच्या नर्सिंग होम मार्फत स्वतःची आरोग्य तपासणी करून घेत या आरोग्य मोहिमेत सहभाग घेतला आहे.

वर्धापनदिनाचे औचित्य साधून एकाचदिवशी राज्यभरातील सुमारे बारा हजार पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याचा संकल्प मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केला असून दरवर्षी ही आरोग्य मोहीम परिषद राज्यभरात राबवित असते, पत्रकार नेहमीच समाजासाठी जगत असतो. अत्यंत धावपळीचे आणि दगदगीचे जीवन जगत असताना पत्रकारांचे आपल्या आरोग्याकडे कायम दुर्लक्ष होते. हे वास्तव लक्षात घेऊन मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने ३ डिसेंबर रोजी राज्यातील तालुका आणि जिल्हा स्तरावर आरोग्य तपासणी शिबिरं घेण्याचा निर्णय घेतला गेला आहे.



यावेळी पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांची रक्त तपासणी, एक्स रे, ईसीजी, एचआयव्ही, मधुमेह आदी तपासणी करण्यात आली. याकरीता डॉ. अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हॉस्पिटलचे डॉ. संदेश शिंदे, डॉ. अनामिका लोहार – गुंड, कमलेश साळवी, नर्स व इतर स्टाफने सहकार्य केले. शिबिरामध्ये रोहा प्रेस क्लब सुहास खरीवले, परिषद प्रतिनिधी शशिकांत मोरे, सरचिटणीस विश्वजित लुमण, संपर्क प्रमुख रविंद्र कान्हेकर, श्याम लोखंडे, नंदकुमार मरवडे, उद्धव आव्हाड, अल्ताफ चोरढेकर, सागर जैन, जितेंद्र जाधव, शरद जाधव, समीधा अष्टीवकर, विश्वजित लुमण, दिनेश जाधव, अंजुम शेटे, रविना मालुसरे, सिद्देश ममाले, नंदकुमार बामुगडे, सचिन साळुंखे, कल्पेश पवार आदींनी सहभाग घेतला,

या आरोग्य शिबीरासाठी गेली १३ वर्षे डॉ. अशोक जाधव व त्यांच्या सहकारी स्टाफने दिलेल्या सहकार्याबद्दल रोहा प्रेस क्लबच्या वतीने अध्यक्ष सुहास खरीवले यांनी त्यांचे आभार मानले.

# पिंगळस आश्रमशाळा सलग तिसऱ्यांदा प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत चॅम्पियन

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

पेण प्रकल्प आदिवासी विकास विभागांतर्गत आयोजित प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६मध्ये कर्जत तालुक्यातील पिंगळस शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेने सलग तिसऱ्यांदा चॅम्पियन ट्रॉफी पटकावत इतिहास रचला.

या वेळी बोलताना रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी, आयुष्यात खेळ हा सर्वात महत्त्वाचा आहे. खेळामुळे शरीर तंदुरूस्त राहते तसेच बुद्धीचा वापरही सतत होतो. एखाद्याचा पराभव तर एखाद्याचा विजय हेच खेळाचे सौंदर्य आहे. खेळ हा कमी वेळेचे जीवन असतो, पण जीवन हा प्रदीर्घ काळाचा खेळ आहे. ज्याला खेळात हरता-जिंकता येते, तोच जगात



खऱ्या अर्थाने यश मिळवतो, अशा शब्दांत विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील २५ आश्रमशाळांमधून सर्वाधिक गुणांची नोंद करत पिंगळस आश्रमशाळेने पुन्हा एकदा वर्चस्व सिद्ध केले. कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हँडबॉल, रनिंग, लांबउडी, गोळाफेक, रिले आदी खेळांतील उच्च दर्जाच्या कामगिरीने विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची वाहवा मिळवली. या खेळात पेण प्रकल्प अधिकारी गलांडे यांनीही विद्यार्थ्यांच्या सोबत सहभाग नोंदवून त्यांना प्रोत्साहित केले.

स्पर्धेत २४ शाळांमधील १२३५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. कर्जत तालुक्यात भरवण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन ठाणे आदिवासी विभाग अपर आयुक्त गोपीचंद कदम यांच्या हस्ते झाले. पेण प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, उपजिल्हाधिकारी व आंतरराष्ट्रीय धावपटू ललिता बाबर-भोसले, क्रीडा संचालक रमेश चव्हाण उपस्थित होते.

प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे म्हणाल्या, अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. शिक्षणाइतकीच मैदानातील कामगिरीही महत्त्वाची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत खेळाकडेही तितकीच निष्ठेने पाहावे.

२९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या तीन दिवसांमध्ये स्पर्धा रंगल्या. अखेरच्या दिवशी पारितोषिक वितरण करण्यात आले.

## बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत 'सीकेटी'चे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त जेबीएसपी संस्था आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पदके जिंकत सुयश प्राप्त केले.




स्पर्धेत सीकेटी विद्यालयाचे १७ वर्षाखालील इयत्ता दहावीचे विद्यार्थी पार्थ प्रमोद निकम व शौर्य शेखर रेवाडकर याने सुवर्ण, तर कुमारन वन्नीयर याने रौप्यपदक पटकाविले. १७ वर्षाखालील सर्वोत्कृष्ट बॉक्सर स्वस्तिक सतीश भोसले ठरला. त्याने सुवर्णपदक जिंकले तसेच विद्यालयाने बॉक्सिंग जनरल चॅम्पियनशिपचे दुसरे पारितोषिक जिंकले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि शिक्षक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दिव्यांग, गतिमंद, अंध व पॅरा पॉवरलिफ्टिंग बेंचप्रेस स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग असोसिएशन व नागरिक सहाय्य केंद्र, विश्वस्त मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग, गतिमंद, अंध व पॅरा पॉवरलिफ्टिंग बेंचप्रेस स्पर्धा ज्ञानेश्वर विद्यालय आरे किडवाई मार्ग वडाळा मुंबई या ठिकाणी नुकतीच स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेचे उद्घाटन आमदार व पॉवरलिफ्टर कॅप्टन तमिल सेल्वन यांच्या हस्ते झाले, तर बक्षीस वितरण समारंभ महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सरचिटणीस संजय शेट्ये, महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सरचिटणीस संजय सरदेसाई यांच्या उपस्थितीत पार पडला.



स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पॅरा ब्लाइंड स्पोर्ट्स महाराष्ट्र असोसिएशन अध्यक्ष नेहा पावसकर, सचिव पंकज चौधरी, भास्कर सावंत, मैदान बचाव समिती व विश्वस्त ज्ञानेश्वर विद्यालय, संजय माधव, बाबू खोत व सूर्यकांत गर्दे यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

## गुरुकुल ऑलिम्पिक स्पर्धेचा बक्षिस समारंभ



**चौक : प्रतिनिधी**

श्री स्वामीनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूल मध्ये आयोजित ऑलिंपिक २०२५ या आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत गुरुकुल शाळेने बाजी मारली असून या स्पर्धेचा बक्षिस समारंभ वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या हस्ते झाला.

या आंतरशालेय स्पर्धेत १७ प्रकारच्या क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. तर रायगड जिल्ह्यातील ३२ शाळांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये श्री स्वामीनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूल यांनी प्रथम क्रमांक, प्रिया स्कूल मोपाडा यांनी द्वितीय क्रमांक तर शांतिनिकेतन पब्लिक स्कूल पनवेल यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, चौक प्रभारी पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार, भाजप नवी मुंबईचे उपाध्यक्ष दत्ता घंगाळे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी निरामय हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. संजय कुरंगळे हे उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत शाळेचे संचालक परमपूज्य साधू विश्व मंगलदास स्वामी परमपूज्य ब्रह्मस्वरूपदास स्वामी आणि प्राचार्य डॉक्टर हरिबाबू पुलीमे रेड्डी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सर्व विजेत्यांना मेडल, प्रशस्तीपत्र आणि आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. सहभागी शाळांना देखील प्रोत्साहन बक्षीस देण्यात आले.कार्यक्रमास विद्यार्थी,शिक्षक, क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## नॅशनल कराटे चॅम्पियनशिपमध्ये अंतरा करांडेला रौप्यपदक



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील महात्मा इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिकणारी १२ वर्षीय अंतरा समीत करांडे हिने नॅशनल कराटे चॅम्पियनशिप स्पधत रौप्यपदक पटकावले आहे.

कराटे इंडिया ऑर्गनायझेशनतर्फे आयोजित ही स्पर्धा दिल्ली येथील तालकटोरा इनडोअर स्टेडियममध्ये झाली. स्पर्धा वर्ल्ड कराटे फेडरेशन, एशियन कराटे फेडरेशन, कॉमनवेल्थ कराटे फेडरेशन, साऊथ एशियन कराटे फेडरेशन या प्रतिष्ठित संघटनांशी संलग्न आहे. यात अंतराने रौप्यपदकाला गवसणी घातली.

गेल्या दोन महिन्यांत अंतराने ऑल इंडिया कराटे चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक, डीएसओ झोन कराटे चॅम्पियनशिप, झोन कराटे चॅम्पियनशिप, वेस्ट झोन कराटे चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक, एसजीएफआय (महाराष्ट्र)मध्ये कांस्यपदक पटकविले आहे. यासाठी तिला एनबीकेसी कराटे क्लासचे अध्यक्ष आणि प्रशिक्षक रोहन यादव यांचे मार्गदर्शन लागले आहे.



**पालघर : मुंबई विद्यापीठ क्रीडा विभाग झोनल ठाणे अंतर्गत घेण्यात आलेल्या हॅन्ड बॉल (जेन्टस) स्पर्धेमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय, मोखाडा यांना तृतीय क्रमाकाचे यश प्राप्त झाले.**






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com